मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, शुक्रवार, ६ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ७८ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



मुख्यमंत्री आहात म्हणून काहीही कराल का?

पान ४

## महाराष्ट्राचा स्वाभिमान मोदींकडे गहाण ठेवू नका - खर्गे

# महाराष्ट्रात ‘मविआ’चे सरकार आल्यावर केंद्रातील मोदी सरकारही जाईल!

**प्रतिनिधी**
**सांगली**

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी मजबूत आहे, त्याला कोणीही हलवू शकत नाही. तीन पक्ष मिळून चांगले काम करत आहोत. राहुल गांधी यांनी ‘डरो मत’चा संदेश दिला आहे, न घाबरता काम करा. भाजपा युती सरकार गुजरातच्या इशा-यावर काम करत आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमानी मोदींकडे गहाण ठेवू नका. लोकसभेप्रमाणेच भरघोस पाठिंबा देत विधानसभेला मविआचे सरकार आणा, असे आवाहन करुन महाराष्ट्रात मविआचे सरकार आले की केंद्रातील मोदी सरकारही जाईल, असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे म्हणाले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या 'लोकतीर्थ' या स्मारकाचे लोकार्पण व पूर्णाकृती पुतळ्याच्या



डॉ. पतंगराव कदमांच्या 'लोकतीर्थ' स्मारकाचे व पुतळ्याचे अनावरण

अनावरणाचा कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील वांगी येथे झाला, या कार्यक्रमात खर्गे बोलत होते. खर्गे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आदर्श, प्रेरणास्रोत आहेत पण नरेंद्र मोदींचा हात त्यांच्या पुतळ्याला लागताच पुतळा कोसळला. मोदींनी गुजरातमध्ये पुलाचे उद्घाटन केले तो पडला, अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन केले, त्याला गळती लागली. घाईघाईत पुतळा बनवल्याने तो कोसळला व महाराष्ट्राचा आणि देशाचा अपमान झाला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यावेळी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची माफी मागितली पण ही माफी त्यांनी पुतळ्याचे काम आरएसएसच्या व्यक्तीला दिले, त्यात भ्रष्टाचार झाला म्हणून माफी मागितली का? असा सवाल विचारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या

### राहुल गांधींनी सांगलीत व्यक्त केला विश्वास

प्रत्येक व्यक्तीची माफी मागितली पाहिजे असे म्हणाले. शेतकरी आंदोलनात अनेक शेतकरी शहीद झाले, नोटबंदीमुळे लघु, छोटे, मध्यम उद्योग संपवले व लाखो लोकांचे रोजगार घालवले, चुकीच्या पद्धतीने जीएसटी लावला त्याबद्दलही माफी मागा, असे राहुल गांधी म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून गावोगावी शैक्षणिक संस्था उभा करून सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडली, त्या कर्मवीर भाऊराव पाटलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील **पान 8 वर**



### आमदार विश्वजीत कदमांचे जोरदार शक्तिप्रदर्शन


सांगली/ ***मंगला वाघे***

*काँग्रेस नेते विश्वजीत कदम यांनी डॉ. पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी खूप खर्च केला. कदम यांनी शक्तिप्रदर्शनासाठी अंदाजे 50 कोटी रुपयांचा खर्च केल्याचे बोलले जात आहे. अनावरण कार्यक्रमासाठी 20 एकर जागा ताब्यात घेण्यात आली. त्यावरील लागवडीखालचा ऊस कापण्यात आला. ज्यांची शेती या वीस एकरात आहे, त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून अंदाजे एकरी चार लाख रुपये देण्यात आले. या 20 एकरामध्ये वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला होता. हा वॉटरप्रूफ मंडप पंजाबच्या जालिंधरमधून आणण्यात आला होता त्याचा खर्च अंदाजे आठ कोटी रुपये आहे. हा वॉटरप्रूफ मंडप उभारण्याचे काम जवळपास एक महिन्यापासून इथे सुरू होते.*

***पान 8 वर***

# मुंबई-गोवा महामार्ग अजून दोन वर्षे रखडणार

### बांधकाम मंत्री चव्हाणांची कबुली



**प्रतिनिधी**
**मुंबई**



चुकीचा कंत्राटदार दिल्यामुळे मुंबई-गोवा महामार्ग रखडल्याची कबुलीच आज सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. त्याचबरोबर आणखी दोन वर्ष हा महामार्ग रखडणार असल्याचंही ते म्हणाले. चुकीच्या ठेकेदारामुळे गोवा महामार्ग आणखी किमान दोन वर्ष रखडणार अशी स्पष्टोक्ती त्यांनी दिली आहे. कोकणात जाणारे रस्ते चांगलेच आहेत. पूल आणि त्याच्या आजूबाजूला असणारा सर्व्हिस रोड यामुळे थोडे अडथळे येत आहेत असं रवींद्र चव्हाणांनी सांगितलं आहे.

"तीन कंत्राटदारांनी चुकीचं काम केल्याने या प्रोजेक्टबद्दल परिस्थिती निर्माण झाली आहे. एक गेला, म्हणून दुसरा दिला पण तोही तसाच. पण हुजूर दिला तर तोही तसाच," असं रवींद्र चव्हाण म्हणाले आहेत. आज चव्हाणांनी एकप्रकारे कबुलीच देऊन आपली हतबलता स्पष्ट केली आहे.

एकनाथ शिंदे यांनी काही दिवसापूर्वी मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी काम सोडून पळून गेलेल्या कंत्राटदारांना उचलून आणून जेलमध्ये टाका, मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवा असा आदेश दिला होता. रस्त्याची अवस्था पाहिल्यानंतर रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन त्यांनी हा आदेश दिला होता.

जे कंत्राटदार काम सोडून पळाले त्यांना केवळ काळ्या यादीत टाकून उपयोग नाही. त्यांच्यामुळं माणसं मेली आहेत, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा. एकालाही सोडायचं नाही, उचलून आणा जेलमध्ये टाका. लोक एवढे मेलेत त्याला हे जबाबदार आहेत. मला याचं रिपोर्टिंग करा, असं एकनाथ शिंदे म्हणाले होते. जेलमध्ये टाकल्याशिवाय यांना धडा मिळणार नाही. ही मोगलाई आहे का? मेसेज एवढा कडक गेला पाहिजे, परत कोणी काम सोडणार नाही अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी संताप व्यक्त केला होता.



वृत्तमानस
प्रासंगिक
गोवा हायवे पूर्ण होण्यास 2027 उजाडेल

दै .वृत्तमानसच्या कालच्या 'प्रासंगिक'मध्ये गोवा हायवे पूर्ण व्हायला अजून किमान अडीच वर्षे लागतील ,असे स्पष्ट करण्यात आले होते. आज राज्याचे बांधकाम मंत्री चव्हाणांनी त्याचाच पुनरुच्चार करीत हा हायवे पूर्ण होण्यास किमान दोन वर्षे लागतील अशी कबुलीच दिली आहें. त्यामुळे 'वृत्तमानस'च्या राजकीय संपादकांचा अंदाज खरा ठरला आहे.

# ग्रामीण महाराष्ट्राच्या पर्यटनाला मिळणार चालना

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विश्वास

**प्रतिनिधी**
**मुंबई**

श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील 8 देवस्थानांच्या सुमारे 275 कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक आज मंत्रालयात पार पडली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# ‘लाडक्या बहिणी’वरुन कॅबिनेटमध्ये सेना आणि राष्ट्रवादी मंत्र्यांमध्ये खडाजंगी

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या श्रेयावरून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे मंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या मंत्र्यांमध्ये वाद झाल्याची खात्रीपूर्वक माहिती आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून मुख्यमंत्र्यांचे नाव वगळून ही योजना आम्ही आणली, असे सांगितले जात आहे, असा आक्षेप नोंदवून अजितदादा एकटेच कसे या योजनेचे श्रेय घेऊ शकतात, असा सवाल शिंदे सेनेच्या मंत्र्यांनी



मंत्रिमंडळात केल्याची माहिती आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केल्यानंतर वाद निवळल्याची माहिती आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. शासकीय निर्णय झाल्यानंतर अधिकारी बाहेर पडल्यानंतर शिंदे सेनेच्या नेत्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या कार्यक्रमावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आक्षेप घेतले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या श्रेय एकटे अजितदादा कसे घेऊ शकतात, असा सवाल केला आहे.

मुख्यमंत्र्यांचे नाव काढून त्या ठिकाणी अजित पवार आपले नाव कसे लावू शकतात. अजितदादांचा वादा आणि जाहिरातींवर शिंदे सेनेचे मंत्री शंभूराज देसाई, दीपक केसरकर, दादा भूसे हे या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आक्रमक झाले होते.

**पान 8 वर**

## बदलापूर पुन्हा हादरले

# रेल्वे स्टेशनवर अंधाधुंद गोळीबार

**प्रतिनिधी**
**बदलापूर**

काही आठवड्यांपूर्वी बदलापूरमध्ये दोन अल्पवयीन मुलींच्या अत्याचार प्रकरणी बदलापूर रेल्वे स्टेशनवरती दहा तास रेल रोको झाला. त्यावेळी मोठा गदारोळ झालेला पाहायला मिळाला होता. आता पुन्हा एकदा बदलापूर रेल्वे स्टेशन हादरले आहे. बदलापूर रेल्वे स्टेशनच्या फलाट क्रमांक एक वरती गोळीबार झाला आहे. या गोळीबारात एक व्यक्ती जखमी झालाय. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. फायरिंग करणाऱ्या व्यक्तीला



पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, रेल्वे स्टेशन परिसरामध्ये बघ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

गोळीबार झाल्याचे समजताच डीसीपी मनोज पाटील घटनास्थळी रवाना झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, दोघांमध्ये वैयक्तिक कारणांमुळे मोटा वाद झाला. त्यानंतर दोघांमध्ये मोठे भांडण झाले. त्यामुळेच एका मित्राकडून दुसऱ्या मित्रावर गोळी झाडण्याचा प्रयत्न झाला आहे. मात्र, गोळी कोणालाही लागलेली नाही.

### स्लॅब कोसळून 3 कामगारांचा मृत्यू

**मुंबई :** मालाड (पूर्व) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास एसआरए अंतर्गत निर्माण केलेल्या २३ मजली इमारतीचा स्लॅब अचानकपणे कोसळला. त्यामध्ये ६ कामगार जखमी झाले. त्यापैकी ३ गंभीर जखमी कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर ३ जखमी कामगारांवर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. गोपाळ मोदी (३२), सोहन रोथा (२६) आणि विनोद सदार (२६) अशी तीन मृत कामगारांची नावे आहेत.

# भारतात अनेक सिंगापूर बनवायचेत : पंतप्रधान मोदी

### दोन्ही देशांत सेमीकंडक्टर डिझाइनिंग व मॅन्युफॅक्चरिंगसह अनेक करार

**वृत्तसंस्था**
**सिंगापूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी 2 दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर पोहोचले. ते गुरुवारी संसदेत पोहोचले आणि पंतप्रधान लॉरेन्स वँग यांनी त्यांचे स्वागत केले. मोदींनी सिंगापूरच्या पंतप्रधानांना सांगितले की, "सिंगापूर हा केवळ मित्र देश नाही तर प्रत्येक विकसनशील देशासाठी




प्रेरणा आहे. आम्हाला भारतातही अनेक सिंगापूर निर्माण करायचे आहेत. मला आनंद झाला. या दिशेने एकत्र प्रयत्न करत आहोत."

भारत आणि सिंगापूर यांनी सेमीकंडक्टर, डिजिटल तंत्रज्ञान, आरोग्य सहकार्य आणि कौशल्य विकास या क्षेत्रात महत्त्वपूर्ण करार केले. करारानुसार, दोन्ही देश अर्धसंवाहक, क्लस्टर डेव्हलपमेंट, सेमीकंडक्टर डिझाइनिंग आणि मॅन्युफॅक्चरिंगवर लक्ष केंद्रित करतील. पंतप्रधान मोदींनी गुरुवारी लॉरेन्स वोंग यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. यावेळी परराष्ट्र मंत्री जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हेही उपस्थित होते.

### सेमीकंडक्टर, इलेक्ट्रीक वाहन निर्मितीत गुंतवणूक

# राज्यात 1 लाख 17 हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

### इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत महाराष्ट्र अग्रेसर राज्य होणार-मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पुणे आणि पनवेल येथे 1 लाख 17 हजार 220 कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित 4 विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मान्यता दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. या प्रकल्पांमुळे सुमारे 29 हजार रोजगार निर्मिती होणार आहे. आज मान्यता दिलेल्या प्रकल्पांमुळे राज्यात सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रीक वाहन निर्मितीमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी जुलै महिन्यात झालेल्या उपसमितीच्या बैठकीत 80 हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे गेल्या दोन महिन्यात झालेल्या बैठकांमध्ये एकूण दोन लाख कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना



मान्यता मिळाली आहे. ज्यामुळे 35 हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. उद्योग मंत्री उदय सामंत दरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे. सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योग घटकांना त्याचा मोठया प्रमाणात फायदा होईल. स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांची रोजगारक्षमता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

टॉवर सेमीकंडक्टर कंपनीचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल येथे करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात 58 हजार 763 कोटी तर दुसऱ्या टप्प्यात रूपये 25 हजार 184 कोटी अशी एकूण 83 हजार 947कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याप्रकल्पामुळे 15 हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.

स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया कंपनीचा प्रकल्प पुणे येथे एकात्मिक पध्दतीने स्थापना करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण 12 हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे एक हजार रोजगार निर्मिती होणार असून प्रकल्पातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रीक व्हेईकलचे निर्मिती केली जाणार आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर कंपनीचा प्रकल्प राज्याचे इलेक्ट्रीक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे **पान8वर**

## छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटना

# 10 सप्टेंबरपर्यंत जयदीप आपटेला पोलीस कोठडी

**प्रतिनिधी**
**मालवण**

सिंधुदुर्गातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी काल अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपी जयदीप आपटोला पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनवणारा शिल्पकार जयदीप आपटेला येत्या 10 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दुर्घटना झाल्यानंतर राज्यातील नागरिकांना संताप व्यक्त केला होता. या घटनेनंतर या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे हा फरार झाला होता. घटनेनंतर तब्बल 11 दिवसांनी फरार जयदीप आपटेला काल पोलिसांनी पकडलं आहे. यानंतर जयदीप आपटेला आज मालवण न्यायालयात हजर करण्यात आलं. अखेर मालवण न्यायालयाने जयदीप आपटेला 10 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सिंधुदुर्गात शिल्पकार जयदीप आपटेनी बनवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा 26 ऑगस्ट रोजी कोसळला. त्यानंतर शिल्पकार जयदीप



आपटे हा फरार झाला. पोलिसांनी जयदीप आपटेच्या विरुद्ध लूकआऊट नोटीस देखील जारी केली होती. काल बुधवारी जयदीप आपटे कल्याणमध्ये पोलिसांच्या तावडीत सापडला. आज जयदीप आपटेला कल्याण पोलिसांनी मालवण पोलिसांच्या ताब्यात दिले. यानंतर जयदीप आपटेला मालवणमध्ये आणण्यात आले. त्याला मालवण न्यायालयासमोर हजर करण्यात आले. आज या प्रकरणाची सुनावणी दिवाणी न्यायाधीश महेश देवकते यांच्यासमोर पार पडली. यावेळी सरकारी वकील तुषार भण गे यांनी बाजू मांडली. तर आरोपीचे वकील गणेश सोहनी यांनीही त्यांची बाजू मांडली. या दोन्हीही बाजू ऐकल्यानंतर न्यायाधीशांनी जयदीप आपटेला 10 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. जयदीप आपटे हा पोलीस कोठडीत राहणार आहे.

## भारताची सौंदर्य प्रसाधनांची बाजारपेठ 10 टक्क्यांनी वाढणार

**मुंबई :** सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा (ब्यूटी अँड पर्सनल केअर) क्षेत्रातील जगातील सर्वांत मोठी चौथ्या क्रमांकाची बाजारपेठ असून भारताची सौंदर्य क्षेत्रातील वाटचाल एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. उत्पादनांचा उच्च दर्जा, ग्राहकांची बदलती आवड आणि तंत्रज्ञानाची प्रगती या जोरावरच ही वाटचाल आतापर्यंत सुकर झाली आहे. पुढील पाच वर्षांत भारताची सौंदर्य, वैयक्तिक आरोग्यनिगा उत्पादनांची बाजारपेठ वार्षिक १० ते ११ टक्के वाढणार असल्याचे नायका ब्यूटी ट्रेंड्स रिपोर्टमधून निदर्शनास आले आहे. या अहवालात सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या नऊ प्रमुख ट्रेंड्सवर प्रकाश टाकण्यात आला आहे. 'रेडसीर'च्या सहकार्याने तयार करण्यात आलेला हा अहवाल या क्षेत्रातील व्यापक घडामोडी, वाढीच्या प्रमुख घटकांचा शोध घेतो आणि उदयोन्मुख ट्रेंड्स उलगडतो. 'सद्यस्थितीत सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा (ब्यूटी अँड पर्सनल केअर) उद्योगाची उलाढाल सुमारे २१ अब्ज डॉलर आहे. आगामी पाच वर्षांत ही बाजारपेठ वार्षिक १० ते ११ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. अशी माहिती 'रेडसीर स्ट्रॅटेजी कन्सल्टंट्स'चे संस्थापक आणि सीईओ अनिलकुमार यांनी दिली.




## थोडक्यात

### शक्तिपीठ महामार्ग रद्दच करा : तो पैसा शेतकऱ्यांसाठी वापरा

**मुंबई:** महाराष्ट्र सरकारने शक्तिपीठ महामार्गासाठी भूसंपादन अधिसूचना मागे घेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आला आहे. राज्य सरकारने तो तातडीने स्वीकारून शक्तिपीठ महामार्गच रद्द करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.संबंधित बारा जिल्ह्यातील बहुसंख्य गावांची मागणी बिनकामाचा रस्ता ही नसून शेती आणि पिण्यासाठी पुरेसे पाणी ही आहे. याच पट्ट्यामध्ये सतत दुष्काळाने ग्रस्त झालेले आणि पाण्यापासून वंचित असलेले तालुकेच्या तालुके आहेत. त्यामुळे कंत्राटदार आणि त्यांचे दलाल सोडून कुणालाच नको असलेला महामार्ग रद्द करून तो पैसा तहानलेल्या शेतीला आणि जनतेला पाणी पुरवण्यासाठी वापरावा, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.आपल्या हक्काचे पाणी मिळवण्याच्या मागणीवर या भागातील जनतेने आणि शेतकऱ्यांनी मोठा लढा उभारावा, असे आवाहन 'माकप' करत आहे.

### गणेशोत्सवात बेस्टकडून अतिरिक्त बसगाड्या सोडणार

**मुंबई:** 'सार्वजनिक गणेशोत्सव' हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा असून या उत्सवाच्या माध्यमातून भक्तीभावासह समाजप्रबोधनही करण्यात येते. विशेषतः मुंबईतील 'सार्वजनिक गणेशोत्सवाला" भक्तीभावासह सजावट बघण्याकरीता देखील भाविकांची आणि पर्यटकांची गर्दी होते. यावर्षीही ७.०९.२०२४ ते १६. ९.२०२४ गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये गणेश भक्ताना विविध ठिकाणी भेट देणे सोयीस्कर व्हावे या दृष्टिने बेस्ट उपक्रमाने रात्रीच्या वेळेस २४ विशेष बसगाडयांचे प्रवर्तन करण्याचे ठरविले आहे. उपरोक्त कालावधीत दक्षिण मुंबई परिसरातून उत्तर-पश्चिम मुंबई कडे गिरगांव, लालबाग, परळ, चेंबूर मार्गे प्रवर्तित होणाऱ्या बसमार्गक्र. ४ मर्या., ७ मर्या., ८ मर्या., ए-२१. ए-२५. ए-४२, ४४, ६६. ६९ वसी-५१ या बसमार्गांवर रात्रीच्या विशेष बसफेऱ्या कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

### गणेशोत्सवानिमित्त कुर्लावासीयांसाठी भाजपकडून मोफत बस

**मुंबई:** सालाबादप्रमाणे यंदाही कुर्ला, कालिना परिसरात राहणाऱ्या कोकणवासीयांसाठी भाजपने मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली, बुधवारी रात्री ९ वाजता इगलवाडी, तानाजी चौक येथुन कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तां साठी मोफत ५ एसटी बसेस सोडण्यात आल्या. महाराष्ट्रात एसटी महामंडळ कर्मचारी वर्गाच्या संपाच्या पार्श्वभूमीवर कोकणवासीयांना बसेस उपलब्ध करुन घेणे ही फार मोठी व अवघड जबाबदारी भाजपा नेते डॉ. नितेश सिंह व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली व प्रवाशांची गैरसोय टाळण्यात आली.

# वसईत यंदा 31 हजार 708 गणरायांचे आगमन

## सार्वजनिक 869 तर घरगुती 30,849 गणराय होणार विराजमान

प्रतिनिधी
■ वसई

गणरायांचे आज शुक्रवारी व उद्या शनिवारी मोठ्या थाटामाटात आगमन होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वत्र धार्मिक व मंगलमय वातावरण आहे. यंदा वसई तालुक्यात 31 हजार 708 गणरायांचे आगमन होत आहे. यात 869 गणराय सार्वजनिक तर 30 हजार 849 गणराय हे घरगुती असणार आहेत.

दरम्यान, यंदा गणेशोत्सवाच्या सणाला महागाईची झळ आहे. मूर्त्या व पुजेच्या साहित्यावर भाविकांना पैसे खर्च करावे लागत आहेत. शिवाय गणपती सणानिमित्त घरोघरी पाहुण्यांचा ओघ असतो, त्यांच्या पंचपक्वान्नासाठी लागणारे साहित्यदेखील महागल्याने यंदा भाविकांना आर्थिकदृष्ट्या तारेवरची कसरत करावी लागत आहे.

उद्या शनिवारी गणरायांचे पूजन होत आहे. त्यानिमित्ताने सर्व तयारी पूर्ण झाली आहे. वर्षागणिक गणारायांच्या संख्येत वाढ होत असून पालिका व पोलीस प्रशासन गणरायांचा उत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी सज्ज झाले आहेत.



### गणेशोत्सवासाठी पोलीस प्रशासन सज्ज

*यंदाचा गणेशोत्सव शांततेत व गुण्यागोविंदाने साजरा व्हावा, कायदा-सुव्यवस्थेची बूज राखण्यासाठी पोलीस फौजफाटा तैनात असणार आहे. वसईची लोकसंख्या 25 लाखांच्या घरात गेली आहे. त्यामुळे महाराष्ट्राची सणावाराची परंपरा आता परप्रांतीय नागरिकदेखील मोठ्या आनंदाने साजरी करत आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मोठे आयोजन असल्याने आगमन व विसर्जन सोहळा सार्वजनिक मंडळं दणक्यात साजरा करतात. यानिमित्ताने आगमन व मिरवणूका शांततेत व इतर धर्मियांच्या भावना न दुखावता साजऱ्या व्हाव्यात यासाठी गणेशोत्सवावर पोलिसांची करडी नजर असणार आहे. वसईतील वसई, विरार, नालासोपारा, माणिकपूर, मांडवी, पेल्हार, आचोळे, तुळिंज, नायगाव, वालीव, अर्नाळा या पोलीस ठाण्यांतील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात असणार आहे.*

### गणेशोत्सवावर पावसाचे सावट?

*गणेशोत्सवाच्या तोंडावर पुन्हा पावसाने मुसळधार हजेरी लावल्याने भाविकांना बाप्पांच्या दर्शनाला जाण्यासाठी पावसाचा सामना करावा लागणार आहे. तसेच विसर्जन मिरवणुकांवरदेखील पावसाचे सावट असल्याचे संकेत मिळत आहेत. सध्या गणरायांच्या मूर्त्या गणेश कला केंद्रातून घरी नेण्यात येत आहेत. मात्र पावसाचा खोडा त्यात रस्त्यातील खड्डे यामुळे भाविकांची पंचाईत होत आहे. गुरूवारी पावसाने हजेरी लावल्याने गणेश मुर्त्या नेण्यात भाविकांना अडचण आली. मात्र दुपारनंतर पावसाने कडक ऊन दिले.*

# 1 गाव, 11 पाडे; रेशनिंग दुकान मात्र एकच; रेशनधान्यासाठी नागरिकांची मोठी परवड

## माजी सरपंच दिनेश म्हात्रे यांचे शासनाला साकडे

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेतील कामण या गावाला लागून 11 आदिवासी बहुल लोकवस्तीचे पाडे आहेत. येथे बहुतांश नागरिक हे रोजंदारीवर काम करणारे असून ते शासनाकडुन पुरवठा करण्यात येणाऱ्या रेशन धान्याचा लाभ घेतात. मात्र कामण एक गाव त्या गावालगतचे 11 छोटे-मोठे पाडे यांसाठी कामण येथे एकच रेशनिंग दुकान असल्याने नागरिकांना खस्ता खात रेशनिंग दुकानापर्यंत यावे लागते. बऱ्याचदा लांबलच्चक रांगा लावूनही रेशन धान्य पदरात पडत नसल्याने गोरगरीब नागरिकांना आल्या पावली परत जावे लागते. याबाबत कामणचे माजी सरपंच दिनेश म्हात्रे यांनी कामण परिसरातील रेशन दुकानाचे विभाजन करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे.

दिनेश म्हात्रे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात, कामण परिसरातील सावंतपाडा, पाचावीपाडा, देवदल, सागपाडा, बेलकडी छोटी, बेलकडी मोठी, खिंडीपाडा, तांबडमाळ, सारजा, कर्नाळा या गावांतील नागरिकांना रेशन धान्याच्या दुकानापर्यंत येण्यासाठी खस्ता खाव्या लागत असल्याची परिस्थिती विषद केली आहे. या गावातील नागरिकांना प्रवास करून येथे यावे लागते. तसेच रेशन धान्य दुकानात येऊन रांगेत उभे राहावे लागते. बऱ्याचदा एक गाव व 11 पाड्यांसाठी आलेले धान्य नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याने बहुतांश नागरिकांना धान्याविना खाली हाताने जावे लागते. बरीचसे आदिवासे पाडे तर कामण येथील रेशनिंग दुकानापासून लांब आहेत व या दुकानात येण्यासाठी या नागरिकांना प्रवास करून यावे लागते. तसेच आजुबाजूच्या आदिवासी पाड्यातील नागरिकांनादेखील कामण येथील रेशनिंग दुकानात येण्यासाठी अनेक अडचणिंचा सामना करावा लागतो.

त्यामुळे येथील गोरगरीब नागरिकांचा वेळ व पैसा वाचावा यासाठी कामण येथील रेशनिंग दुकानाचे विभाजन करण्यात यावे अशी मागणी कामणचे माजी सरपंच दिनेश म्हात्रे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# इमारतीची लाकडी परांची पडून 2 तर भिंत कोसळून 2 व्यक्ती जखमी

■ मुंबई

मंगळवारी पाऊस नसताना दुपारच्या सुमारास पूर्व उपनगरात विद्याविहार येथे इमारत बांधकामासाठी वापरलेली परांची कोसळून २ व्यक्ती जखमी झाले. तसेच, रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास विक्रोळी येथे भिंत कोसळून २ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. अवघ्या १२ तासात दोन दुर्घटना घडून त्यामध्ये एकूण ४ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. सुदैवाने त्यामध्ये, कोणी मृत्युमुखी पडले नाही.

मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी दुपारी १.४५ वाजताच्या सुमारास विद्याविहार येथे प्रथमेश डेव्हलपर्स, एसटी डेपो वर्कशॉप, नेव्ही कॉलनी, नौसेना विहारसमोर बांधकाम सुरू असलेल्या तळमजला अधिक १५ मजली इमारतीची बांबुची परांची अचानकपणे कोसळून झालेल्या दुर्घटनेत नबियाद शेख (२६) आणि मोहन शेख (३८) या २ व्यक्ती जखमी झाल्या. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच त्यांना स्थानिकांनी तत्काळ नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले असता त्यांना दाखल करून घेण्यात आले आहे.

दुसरी दुर्घटना विक्रोळी (पश्चिम), जैन सोसायटी, वर्षानगर, स्मशानभूमीजवळ, डोंगरावरील घराच्या भिंतीचा काही भाग घरांच्या पत्र्यावर पडला. सदर दुर्घटनेत २ व्यक्ती जखमी झाल्या. मात्र त्यांनी रुग्णालयात उपचार घेण्यास नकार दिला. त्यांनी स्थानिक पातळीवर उपचार करून घेतले. दरम्यान, सुरक्षिततेचा उपाय म्हणून दुर्घटना स्थळी २ घरे रिकामी करण्यात आली आहेत. त्यात राहणाऱ्या रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली असल्याचे समजते.

***मुंबई: अखिल भारतीय लॉटरी विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अनुज बाजपेयी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त अनुज बाजपेयी यांनी भाजपा मुंबई अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतला.या प्रसंगी कामगार नेते मुंबई सचिव जितेन्द्र राऊत यांच्यासह उपाध्यक्ष महेन्द्र दिघे, चिटणीस आशिष मुणगेकर आदीसह अन्य सहकारी उपस्थित होते***



# 2100 रुपयाच्या चार चांदीच्या कॉईनसाठी 'ट्रिपल मर्डर'

■ पालघर

वाडा तालुक्यातील नेहरोली येथे मागील आठवड्यात झालेल्या तिहेरी हत्याकांडाचा उलगडा करण्यात पालघर पोलिसांना यश आलं आहे. ट्रिपल मर्डरने पालघर हादरले होते. मात्र या हत्येमागचे नेमके कारण समोर आले असून पैशासाठीच भाडेकरूनेच खून केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

वाडा तालुक्यातील नेहरोली येथे मागील आठवड्यात मुकुंद राठोड, त्यांची पत्नी कांचन राठोड आणि मुलगी संगीता राठोड या तिघांचा मृतदेह बंद घरात आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती . या प्रकरणात याच राठोड कुटुंबीयांकडे भाडेकरू म्हणून राहणाऱ्या आरिफ अन्वर अली या मूळच्या उत्तर प्रदेशातील आरोपीला पालघर पोलिसांनी उत्तर प्रदेशातून अटक केली आहे . घर मालकांकडे पैसे असतील या चोरीच्या उद्देशाने या तिघांचीही या आरोपीने डोक्यात हातोडा घालून निघृण हत्या केल्याचं उघड झालं असून हत्येनंतर आरोपी उत्तर प्रदेशात पसार झाला होता

### हत्या करुन चार चांदीच्या नाण्यांची केली चोरी

*हत्या केल्यानंतर आरोपीने या घरात चार चांदीच्या कॉइनची चोरी केली.त्याने त्या चांदीच्या नाण्यांची प्रयागराज येथे विक्री केली त्याचे त्याला 2100 रुपये मिळाले. मात्र या सगळ्या तपासात पालघर पोलिसांना ठाणे येथील श्वानपथकाने विशेष मदत केली असून सध्या आरोपीला अटक करण्यात आली आहे .*

# मंत्र्यांच्या आश्वासनामुळे वकीलांचे आंदोलन स्थगित

प्रतिनिधी
■ वसई

नव्या इमारतीच्या जागेसाठी वसईतील वकीलांनी सुरु केले आंदोलन सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या आश्वासनामुळे दोन दिवसांनंतर तुर्तास मागे घेण्यात आले आहे.

न्यायालयाच्या नव्या इमारतीसाठी वसई तालुक्यातील चारही वकील संघटनांनी २ सप्टेंबरपासून आंदोलन सुरु केले होते.पहिल्या दिवशी मोर्चा काढल्यानंतर सलग दोन दिवस या संघटनांनी धरणे आंदोलन करुन प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते. वसईतील न्यायालयाची इमारत जिर्ण झाली असून वाढते दावे आणि केसेसची संख्या लक्षात घेता चाळीस अधिक न्यायालय असणे आवश्यक असताना केवळ अकरा न्यायधीशांना काम करावे लागत असल्याने प्रचंड दिरंगाई होत आहे. तर त्याचा परिणाम न्यायदानावर होत असल्याने न्यायालयाची सुसज्ज इमारत असावी यासाठी वकील संघटना मागील अनेक वर्ष प्रयत्नात आहेत आणि त्याचे फलीत म्हणून उच्च न्यायालयाने गाव मौजे मालोंडे येथील सिटी सर्वे नं ३७६ या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५७०० चौ.मि.जागेवर न्यायालयाच्या इमारतीचा प्रस्ताव मंजूर करून शास्नाकडे पाठविलेला आहे.मात्र शासकीय स्थरावर ही जागा कोर्टाच्या नावे होण्यास विलंब होत असल्यामुळे वकील संघटनाने शांततापूर्ण मोर्चा काढून आंदोलनाला सुरवात केली होती. जागा न्यायालयाच्या नावे होईपर्यंत दररोज धरणे आंदोलन सुरु ठेवण्याचा निश्चय वकीलांनी केला होता.या आंदोलनाला पक्षकार,राजकीय कार्यकर्ते आणि पत्रकारांनी पाठींबा दिला होता.त्यामुळे या आंदोलनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते.

तहसीलदार अविनाश कोष्टी आणि उपविभागिय अधिकारी शेखर घाडगे यांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या आणि त्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.त्याचप्रमाणे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे सदस्य ॲड संग्राम देसाई यांनीही आंदोलनाला भेट देऊन, सार्वजनिक बांधकाम मंत्री हा प्रश्न मार्गी लावतील असे स्पष्ट केले. त्यानंतर देसाई यांनी नामदार रविंद्र चव्हाण यांच्याशी मोबाईलवरुन संपर्क साधून आंदोलकांशी बोलणे करुन दिले.

त्यावेळी एक आठवडयाच्या आत सदर जागा कोर्टाच्या नावे करण्याचे आश्वासन चव्हाण यांनी दिले.त्यामुळे या सर्व बावींचा साकल्याने विचार करुन आंदोलन तात्पुर्ते स्थगित करण्याचा निर्णय आंदोलकांनी घेतला आहे.

# गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यासाठी शिवसेनेकडून कृत्रिम तलावाची निर्मिती



■ मुंबई

गणेशोत्सव काळात तमाम गणेश भक्तांना गणेश मुर्तिंचे विसर्जन करण्यासाठी काही अडचण येऊ नये म्हणुन शिवसेनेच्यावतिने ईशान्य मुंबईत कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येत आहे. जेणे करुन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अशा तलावांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यात यावा, असे आवाहन जीवनदान संस्थेच्या अध्यक्षा राजोल संजय पाटील यांनी केले आहे. त्यांच्या शुभहस्ते मुलुंड मध्ये कृत्रिम तलावाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

मुलुंड पश्चिम येथील नाहूर या ठिकाणी असलेल्या अँटमॉस पेअर्स सोसायटीच्या आवारात गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येत आहे. जीवनदान संस्थेच्या अध्यक्षा राजोल संजय पाटील यांच्या हस्ते या तलावाच्या कामाच शुभारंभ करण्यात आला. पर्यावरणाला बाधा होऊ नये तसेच गणेश भक्तांना गणरायांच्या मुर्तिंचे विसर्जन करताना काही अडचण येऊ नये म्हणुन शिवसेनेच्यावतिने ईशान्य मुंबईत असे कृत्रिम तलाव बांधण्यात येत आहे.

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### नोटीस

माझ्या अशिल, श्री तौहीद ए. सोफिया यांच्या वतीने नोटीस दिली जात आहे, जे सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, ब्लॉक डी, शिमला हाऊस कॉ ऑप हौ सो लि, नेपियन सी रोड, मुंबई – ४००००६ चे सध्याचे मालक आहेत व सदर सोसायटीच्या शेअर्स प्रमाणपत्र क्र. ४८, दिनांक ११/०१/१९७१ अंतर्गत (५) शेअर्स २३६ ते २४० पर्यंत सभासद आहे.

मूळ हा सदनिका दि. २९.०५.१९६९ च्या करारानुसार, मास्टर महेश हरजानी, मास्टर मदन हरजानी, मिस सोनू हरजानी आणि मिस रिटा हरजानी यांनी त्यांच्या वडिलांच्या मार्फत आणि नैसर्गिक पालन करता श्री दौलतराम हरजानी यांनी मे. ईश्वरदास हरिदास भाटिया यांच्याकडून खरेदी केला होता, त्यानंतर दिनांक २४.१०.१९८५ च्या गिफ्ट डीडद्वारे श्री महेश, श्री मदन, मिस सोनू उर्फ सुनीता. आणि मिस रिटा यांनी त्यांचे हक्क श्रीमती गंगा लीलाराम भारवानी ह्यास दान केले व सदर सदनिका तिच्या नावावर झाला व श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यांनी दिनांक ३१.१२.२०१३ रोजी नोंदणीकृत कराराद्वारे श्री नुसरत अब्दुल गनी, श्री गुलजार अहमद सोफिया आणि श्री तौहीद अब्दुल सोफिया यांना सदर सदनिका विकला. त्यानंतर श्री नुसरत गनी आणि श्री गुलजार सोफिया यांनी ०५.०३.२०२१ रोजीच्या नोंदणीकृत गिफ्ट डीडद्वारे श्री तौहीद सोफियाच्या नावावर उक्त मालमत्तेतील १/३ हिस्सा दान केली, व सदर सदनिका श्री तौहीद सोफिया ह्यांचे नावे सध्या आहे.

दिनांक २४.१०.१९८५ रोजी निष्पादित केलेले सर्व अनोंदणीकृत गिफ्ट डीड 1) श्री महेश हरजानी आणि श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यांच्यात निष्पादित केलेले २) श्री मदन हरजानी आणि श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यांच्यात निष्पादित केलेले ३) मिस सोनू उर्फ सुनीता आणि श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यांच्यात निष्पादित केलेले ४) मिस रीटा हरजानी आणि श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यांच्यात निष्पादित केलेले, सर्व डीड त्यांच्या मुखत्यारपत्र धारक, वडील आणि नैसर्गिक रक्षक श्री दौलतराम हरजानिहास यांच्या द्वारे श्रीमती गंगा लीलाराम भारवानी यास दान केले. वरील सर्व निष्पादित केलेले सर्व अनोंदणीकृत गिफ्ट डीड हरवले / गहाळ झाले आहे आणि सर्वोत्तम प्रयत्न करूनही ते शोधता आले नाही. माझ्या अशिल दि. ०४/०९/२०२४ रोजी मरीन ड्राईव पोलिस स्टेशनमध्ये हरवल्याची नोंद केली आहे, अहवाल क्रमांक १०४०९ -२०२४.

माझ्या अशिलच्या वतीने, श्री. तौहीद ए. सोफिया, खाली स्वाक्षरी केलेले वकील याद्वारे दावे किंवा आक्षेप आमंत्रित करतात, जर काही दावे/आक्षेप असतील तर कृपया अधोस्वाक्षरी केलेल्या वकिलाला त्यांच्या दाव्यांना/आक्षेपांचे समर्थन करण्यासाठी संबंधित कागदपत्रांसह ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसाच्या आत कळवा. निर्धारित कालावधीत कोणताही दावा नसताना, हरवलेल्या करारामुळे मालमत्तेवर कोणताही दावा नाही असे मानले जाईल. आणि माझ्या अशिलच्या विनंती केल्यानुसार मी नो क्लेम सर्टिफिकेट जारी करीन आणि त्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही**
**ॲड. रजत के. सिंह**
**कार्यालय क्र. १३८, पहिला मजला, ओस्तवाल ऑर्नेट,**
**बिल्डिंग क्र. २/ए, जैन मंदिरा जवळ, जेसल पार्क,**
**भाईंदर पूर्व, जि.ठाणे - ४०११०५ (मोब. क्र. ८१६९८७५१९५)**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ०६/०९/२०२४.**

OUTDOOR MEDIA LIMITED

**Bright Outdoor Media Limited**
**CIN - L74300MH2005PLC156444**
**Regd. Office:** 801, 8th Floor, Crescent Tower, Near Morya House, Fame Infinity Mall, Off New Link Road, Andheri (W), Mumbai, Maharashtra, India, 400053
Tel No. 67140000-99
**Email Id. investor@brightoutdoor.com Website: www.brightoutdoor.com**

**NOTICE**

Notice is hereby given that the 19th Annual General Meeting **('AGM')** of the members of **Bright Outdoor Media Limited ('the Company')** will be held on **Thursday, 26th Day of September, 2024 at Hotel Peninsula Grand, Sakinaka Junction, Lokmanya Tilak Nagar, Saki Naka, Andheri (East), Mumbai - 400069, Maharashtra, India at 12:00 Noon,** to transact the business(es) set out in the Notice of AGM.

The Notice of the AGM along with the Annual Report of the Company for the Financial Year 2023-24 have been sent through, electronic mode via e-mails to those Members whose e-mail ids are registered with Depository Participant(s) / Registrar and Share Transfer Agent ("RTA") of the Company as on 30th August, 2024 (Cut-off date). The dispatch of the Annual Reports has been completed on 04th September 2024. The aforesaid documents are also hosted on the website of the Company viz. **www.brightoutdoor.com** and Stock Exchange website i.e., BSE LTD. at **https://www.bseindia.com/**

In compliance with the provisions of Section 108 of the Act read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 **('the Rules')** and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 **('Listing Regulations')** and Secretarial Standards on General Meetings ('SS-2') issued by the ICSI, as amended from time to time, Members are provided with the facility to cast their votes on all the resolutions set forth in the Notice of AGM using the electronic voting platform **(https://ivote.bigshareonline.com)** provided by Bigshare Services Private Limited.

In accordance with Rule 20 of the Rules, the Company has fixed **Thursday, 19th September, 2024,** as the **"cut-off date"** to determine the eligibility of members to vote on the business(es) set out in the Notice of AGM.

Members are requested to note the following:

(a) (i) The remote e-voting period will commence on Monday, 23rd September, 2024 at 09:00 a.m. (IST) and will end on Wednesday, 25th September, 2024 at 05:00 p.m. (IST). The remote e-voting system shall be disabled by Bigshare Services Private Limited thereafter. Members shall not be allowed to vote electronically beyond the said date and time. Once the vote is cast on a resolution, the member shall not be allowed to change it subsequently. (ii) The facility for voting will also be made available during the AGM and the members present in the AGM physically, who have not cast their vote through remote e-voting, shall be eligible to vote through the Ballot Paper during the AGM. (iii) The Members who have cast their vote by remote e-voting may join the AGM but shall not be entitled to cast their vote again.

(b) Any person, who acquires share(s) and becomes member of the Company after dispatch of the Notice of AGM and holds shares as on the cut-off date, may obtain the login ID and password by sending a request at https://ivote.bigshareonline.com

For the process and the manner of remote e-voting as well as voting through ballot paper during the AGM, member(s) may go through the instructions stated in the Notice of AGM. In case of any queries/ grievances pertaining to e-voting, shareholders/ investor has any queries regarding E-voting, you may refer the Frequently Asked Questions ('FAQs') and i-Vote e-Voting module available at https://ivote.bigshareonline.com, under download section or you can email us to ivote@bigshareonline.com or call us at: 1800 22 54 22.

**For Bright Outdoor Media Limited**

Sd/-
**Yogesh Jiwanlal Lakhani**
Managing Director
DIN: 00845616

**Place:** Mumbai
**Date:** 04-09-2024

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 76**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ७६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## अतिरिक्त पालिका आयुक्तांकडून कृत्रिम तलावांची पाहणी

**मुंबई :** श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी नैसर्गिक आणि कृत्रिम स्थळांवर केलेल्या व्यवस्थेची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांनी काल भेट देऊन पाहणी केली. उप आयुक्त (परिमंडळ २) तथा गणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. कुर्ला (पूर्व) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानातील कृत्रिम तलाव, मुलुंड येथील मौर्या तलाव, पवई येथील पवई तलाव, जोगेश्वरी (पूर्व) येथील शाम नगर तलाव, जुहू चौपाटी, माहीम रेती बंदर आदी ठिकाणांना सैनी यांनी भेट दिली.



# शिक्षकांमध्ये जग बदलण्याची ताकद - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विद्यार्थ्यांना आयुष्याची दिशा दाखविण्यात शिक्षकांचे समर्पण, मार्गदर्शन आणि योगदान महत्त्वाचे असून त्यांच्यामध्ये जग बदलण्याची ताकद असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. महाराष्ट्र विविध क्षेत्रात देशात क्रमांक एकवर आहे. शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर राहण्यासाठी आपण निर्धार करुया, असे आवाहन त्यांनी केले.

सन २०२३-२४ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांना आज मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. एनसीपीए येथील टाटा सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय ए कुंदन, शालेय शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला, शिक्षक आमदार किरण सरनाईक, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी संभाजी थोरात आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. मंत्री श्री.केसरकर यांच्या कार्यकाळातील निर्णयांचे संकलन असलेल्या कार्यअहवालाचे तसेच बालभारतीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज स्मृती ग्रंथाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्यमंत्री म्हणाले, शिक्षकांच्या योगदानाशिवाय देश प्रगतीपथावर जाऊ शकत नाही, यामुळेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात राज्याला अग्रेसर राखण्यासाठी नवनवीन कल्पनांना शासनाने नेहमीच पाठबळ दिले आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच कौशल्याची जोडही आवश्यक असल्याने नवीन शिक्षण पद्धती अवलंबण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आयुष्यात मोठी उंची गाठणे शक्य होईल आणि या कामी योग्य वेळी योग्य दिशा दाखवण्याचे काम शिक्षक करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमाच्या माध्यमातून तीन जागतिक विक्रम प्रस्थापित झाले आहेत. आदर्श शाळा विद्यार्थ्यांना जगण्याचा मंत्र शिकवित असल्याने आदर्श शाळा घडविण्यामध्ये शिक्षकांची भूमिका मोलाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात देशात पहिल्या क्रमांकाकडे झेप घेण्यामध्ये शासकीय शाळांचा मोठा वाटा असल्याचे सांगून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न आस्थेवाईकपणे सोडविण्यात येतील असेही ते म्हणाले. आपल्या किसननगर येथील शाळेच्या आठवणी जागवून आपल्या प्रगतीमध्ये शिक्षक रघुनाथ परब यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. इमारतींपेक्षा शिक्षकांवरून शाळेचे महत्त्व ठरते असे सांगून खडू आणि छडीच्या जोरावर आयुष्याची शिडी चढण्यास शिकविणाऱ्या शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. ॲड.नार्वेकर म्हणाले, 'वाचाल तर वाचाल' असे नेहमी म्हटले जाते. परंतु जो वाचायला शिकवतो तो समाज घडवतो, यामुळे चांगला समाज घडविण्यामध्ये शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. शासनाने शिक्षण क्षेत्राला प्राधान्य दिले असून देशाला जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्यासाठी अग्रेसर होण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

### क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारांचे वितरण



### क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार

*गौरी राजेंद्रकुमार शिंदे, गोरेगाव पूर्व, मुंबई; सुनिता भाऊसाहेब इंगळे, कोपरगाव, ता. कोपरगाव, जिल्हा अहमदनगर; दिपाली सुकलाल आहिरे, नाशिक; अंजली शशिकांत गोडसे, बिरामणेवाडी, ता. जावली, जिल्हा सातारा; रत्नमाला एकनाथ शेळके, पोरजवळा, केंद्र पिंगळी, ता. जिल्हा परभणी; सुनंदा मधुकर निर्मले, बेलवाडी, ता.लोहारा, जिल्हा धाराशिव; सुलक्षणा प्रमोद गायकवाड, मोहाळा (रै), पंचायत समिती पोंभुर्णा, जिल्हा चंद्रपुर; सुनिता शालीग्रामजी लहाने, वाढोणा, पोस्ट खैरी, ता. अचलपूर, जिल्हा अमरावती; विशेष शिक्षक (कला) - राजेश भिमराज सावंत, नाशिक; विशेष शिक्षक (क्रीडा) - नीता अनिल जाधव, घाटकोपर पूर्व, मुंबई; दिव्यांग शिक्षक / दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक - संतोष मंगरु मेश्राम, खराळपेठ, ता.गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपुर; स्काऊट शिक्षक - भालेकर सुखदेव विष्णू, चव्हाणवाडी, पोस्ट काटगाव, ता. तुळजापर, जिल्हा धाराशिव; गाईड शिक्षक - शुभांगी हेमंत पांगरकर, छत्रपती संभाजीनगर; सन 2022-23 मधील पुरस्कार - शरद गोपाळराव ढगे,पोहणा, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा.*

# आपटेंना त्यांचा बॉसही वाचवू शकला नाही, अटकेच्या 8 दिवसांआधीच ठाण्यातून जामिनाची तयारी...

### खासदार संजय राऊतांचा गंभीर आरोप

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवभक्तांचा दबाव आणि रेटा इतका होता, शिल्पकार जयदीप आपटे यांचे बॉसही त्यांना वाचवू शकले नाहीत. मात्र अटक होण्याआधी सिंधुदुर्ग कोर्टात त्यांच्या जामिनाची तयारी आठ दिवसांपासून सुरु आहे. त्यासंदर्भात ठाण्यातून सूत्रे हलत आहेत, असा गंभीर आरोप ठाकरे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अपघात प्रकरणातील आरोपी शिल्पकार जयदीप आपटे याला काल रात्री कल्याणमध्ये अटक करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर राऊत बोलत होते.

वर्षा बंगल्यावर जी शक्ती आहे, ती शक्ती मंत्रालयात आहे, मालवणात आहे, त्यामुळेच इतके दिवस जयदीप आपटे पोलिसांना चुकवू शकले. पण शिवभक्तांचा इतका दबाव आणि रेटा होता. की त्यांचे बॉसही आपटेंना वाचवू शकले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासंदर्भात राज्यात जे घडलं ते आधी कधीच घडलं नव्हतं, आपटेंपेक्षाही ज्यांनी त्यांना अनुभव नसतानाही काम दिलं, ते बेकायदेशीर होतं. ते सूत्रधार आजही सरकारमध्ये आहेत.



त्यांच्यावर कारवाई कधी होणार? असा सवाल संजय राऊत यांनी विचारला.

जामिनाची तयारी आधीपासूनच जयदीप आपटेंना अटक होण्याआधी सिंधुदुर्ग कोर्टात त्यांच्या जामिनाची तयारी आठ दिवसांपासून सुरु आहे. त्यासंदर्भात ठाण्यातून सूत्रं हलत आहेत. मी वारंवार ठाण्याचा उल्लेख करतोय. जयदीप आपटे दोन दिवसात सरेंडर होतील. ताबडतोब त्यांच्या जामिनाची व्यवस्था करा, अशी सूत्रं ठाण्यातून हलत आहेत. त्यासंदर्भात जी कायदेशीर मदत लागते, तीसुद्धा ठाण्यातून मिळत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत ज्यांनी बाजार मांडला आणि केला, त्याच्या षडयंत्राचे सूत्रधार ठाण्यात आहेत, असा आरोपही संजय राऊत यांनी केला.

### *आमचा आक्षेप पुतळ्याच्या कामातील भ्रष्टाचाराला*

*आम्ही यात राजकारण करु इच्छित नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानानंतर राज्यात जी स्थिती निर्माण झाली आणि लोकभावना दडपण्याचा प्रयत्न झाला, तो कोणालातरी पाठीशी घालण्यासाठी. या कामात जो भ्रष्टाचार झाला आहे, तो दडपण्यासाठी. आमचा लढा आणि विरोध त्यासाठी आहे. कोट्यवधींचं काम मंजूर झालं आणि प्रत्यक्षात काम २०-२५ लाख रुपयात आटपलं आहे. मंजूर खर्च आणि कामात तफावत आहे. त्यामुळे तो पडला, पण मुख्यमंत्री म्हणतात की ४५ किलोमीटर ताशी वेगाने वाऱ्यामुळे पडला, अशी टीकाही संजय राऊत यांनी केली.*

# रेबिजमुक्त मुंबई'साठी 28 सप्टेंबर पासून संपूर्ण मुंबईत लसीकरण मोहीम

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

श्वानांच्या चाव्यामुळे होणाऱ्या रेबीज या प्राणघातक रोगापासून बचावाच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'रेबिजमुक्त मुंबई'साठी पुढाकार घेण्यात आला आहे. या अंतर्गत २८ सप्टेंबर २०२४ पासून संपूर्ण मुंबई महानगरामध्ये व्यापक लसीकरण मोहीम हाती घेण्यात येणार आहे. तसेच रेबिजबाबत मुंबई महानगरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनजागृतीही करण्यात येणार आहे.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सन २०३० पर्यंत भारत रेबीजमुक्त करण्यासाठी राष्ट्रीय कृती आराखडा आखला आहे. त्या अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेने २०२२ मध्ये मुंबई रेबीज निर्मूलन प्रकल्प हाती घेतला. याच पार्श्वभूमीवर आता 'वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस-मिशन रेबीज' यांच्यासोबत मिळून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने २८ सप्टेंबर २०२४ पासून भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानेही पुढाकार घेण्यात आला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था, शाळा, बांधकाम स्थळे, सार्वजनिक संस्था इत्यादींपर्यंत पोहोचून प्राणीविषयक कल्याणकारी कायदे आणि नियमांसंदर्भात जनजागृती वाढवण्यात आली आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये ६५ शाळांमधील सुमारे १३ हजार ३३२ विद्यार्थ्यांना याबाबत माहिती देण्यात आली. यामध्ये २७१ शिक्षक आणि ७९३ नागरिकांनीही सहभाग नोंदवला.

# राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षकांच्या मागण्या सोडविण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

### संप आंदोलन संस्थगित केल्याची घोषणा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राष्ट्रीय पेन्शन, सुधारित पेन्शन, एकत्रित पेन्शन योजना (केंद्र) या योजनां मधील एक योजना स्विकारण्याची कर्मचाऱ्याला मुभा. राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांसाठी आगळी भेट. इतर मागण्या समयबध्दतेने सोडविल्या जातील. अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्यानंतर ४ सप्टेंबर नंतरचे संप आंदोलन संस्थगित केल्याची घोषणा राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी दिली.

मार्च २०२४ च्या अर्थसंकल्पात घोषित करण्यात आलेली सुधारित निवृत्ती वेतन योजना-२०२४, महाराष्ट्रातील कर्मचारी-शिक्षकांना १ सप्टेंबर २०२४ पासून लागू करण्यात येईल असा निर्णय मुख्यमंत्र्यांसह सहयाद्री अतिथीगृहात संघटना प्रतिनिधींसोबत झालेल्या चर्चेत घेण्यात आला. केंद्राच्या एकीकृत पेन्शन योजनेपेक्षा राज्याची योजना सरस असल्याचे यावेळी संघटना प्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिले. सुधारित पेन्शन योजनेमुळे ४.५ टक्के योगदान (Contribution) रक्कमेची राज्य शासनाची बचतही होईल हे सुध्दा यावेळी निदर्शनास आणण्यात आले. चर्चेअंती मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीय पेन्शन योजना, सुधारित पेन्शन योजना व एकत्रित पेन्शन योजना या तीन योजनांमधील कोणतीही एक योजना स्विकारण्याची मुभा कर्मचारी-शिक्षकास असेल असा निर्णय सभास्थानीच मुख्यमंत्र्यांनी जाहिर केला. या संदर्भातील शासन अधिसूचना/शासन निर्णय आगामी आठवडाभरात निर्गमित केला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरात/अधिसूचनेव्दारे ज्या कर्मचारी-शिक्षकांची निवडप्रक्रिया सुरु झाली होती अशा सर्व कर्मचारी-शिक्षकांना सन १९८२ च्या नियमा अंतर्गत समाविष्ट करण्याबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, अनुकंपा तत्वावरील तत्कालीन प्रतिक्षा यादीतील कर्मचारी यांचे संदर्भातील न काढलेले आदेश सत्वर प्रसृत करण्यात यावेत अशी संघटनेच्यावतीने आग्रही विनंती करण्यात आली. ग्रॅच्युईटी रक्कमेत केंद्राप्रमाणे २५ लाख रुपयांपर्यंत वाढ देणे, निवृत्तीवेतन/अंशराशीकरण पुनर्स्थापना कालावधी १२ वर्षानंतर कमी करा या मागण्या अगोदर विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आल्या असून शासनाच्या मान्यतेच्या टप्प्यात आहेत असे निवेदन १४ डिसेंबर २०२३ रोजी विधानसभेत सादर करण्यात आले आहे. या संदर्भातील प्रलंबित कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी अशी रास्त मागणी यावेळी करण्यात आली. रिक्त पदे विनाविलंब भरा, अनुकंपा तत्वावर एकवेळची बाब म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी, चतुर्थश्रेणी ड वर्गाची पदे तसेच वाहन चालक पदावरील भरतीस केलेली बंदी तत्काळ उठवा, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वारसाहक्क नियुक्त्या पुन्हा सुरु करा. १० वर्षांपेक्षा जास्त सेवाकाळ पूर्ण झालेल्या कंत्राटी/रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, या मागण्यांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.



*मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतक महोत्सवी समारंभात विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार महामहीम राष्ट्रपती द्रौपती मुर्मु यांच्या हस्ते लोकप्रिय आमदार सुनील शिंदे यांचा सन्मान झाल्याबद्दल शिवसेना शाखा क्रमांक १९८ तर्फे त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी आमदार सुनील शिंदे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना शशिकांत नांदगावकर, बाळा मोहिते, संतोष मोरे आणि विजय कदम.*


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelecorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.४२२/४२३/२०२४ दिनांक :- ०४/०९/२०२४

**ई-निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अवांतर अभ्यासक्रम सराव पुस्तके, हस्तपुस्तिका, नोटबुक खरेदी करण्याबाबत या कामाची ई- निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे.या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/शिक्षण/निविदा/ ०३ / २०२४
दिनांक : ०५/०९/२०२४

सही/-
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका

## महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल पिनकोड ४१० २०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ४४ ( ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे ( दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी- १ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप- या निविदेमध्ये एकूण ३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०५/०९/२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक १२/०९/२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./ सा.बां./पनवेल/ ४९१०
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :- ३०/८/२०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२६४७

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | २०२४_एमसीजीएम_१०८०९०५_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | ई प्रभागामधील माझगाव एसडब्ल्यूडी चौकी येथे सर्व हवामान संरक्षण सुविधेची दुरुस्ती आणि उत्पादनाचे काम. |
| निविदेचे शुल्क/छाननी शुल्क | रु. ६००/- + १८% (जीएसटी) |
| ई-निविदेचे मूल्य/(अंदाजे मूल्य) | ५,०१,१०२.०० (जीएसटी वगळता) |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. ६०००/- |
| निविदा वितरण आणि विक्री दिनांक | ०६.०९.२०२४ रोजी ११.०० वा. पासून |
| निविदा विक्रीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | १२.०९.२०२४ रोजी १२.०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि लिफाफा सी सादरीकरण (ऑन लाईन) | १२.०९.२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | १३.०९.२०२४ रोजी १६:०० वा. नंतर |
| पत्रव्यव्हाराचा पत्ता | ह्यांचे कार्यालय: कार्यकारी अभियंता यांत्रिकी (दक्षिण) बृमनपा महापालिका कार्यशाळा, १०३, आर. एस. निमकर मार्ग, भायखळा (प) मुंबई ४०० ००८ |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | लागू नाही |
| संपर्क व्यक्ती | |
| ए) नाव | श्री. एस.एस. पाटील |
| बी) दूरध्वनी कार्यालाय | ०२२ २३०८३०५१/ ५२/ ५३/ ५४ |
| सी) ई-मेल आयडी | eemechsouth.me@mcgm.gov.in |
| डी) संकेतस्थळ | https://portal.mcgm.gov.in |

सदर निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा स्वीकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/११८६/जाही/२०२४-२५
गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

सही/-
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी (दक्षिण)

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडा चा घटक)
म्हाडा MHADA

**निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी. एम.सी. फ दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई- ४०००१२. यांचेकडे म्हाडा / सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी. पी. डब्ल्यू. डी / एम. आय. डी. सी./बी.पी.टी./एम.ई.एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी १ फॉर्ममध्ये (टक्केवारी दर)] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.


| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम [ विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १. | उपकरप्राप्त इमारत क्र. १८, छेडा भवन, डॉ. एस.एस.राव रोड, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम] | ३,४५, ४९९/- | ३४५५.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| २. | उपकरप्राप्त इमारत क्र. १, मोहमदी रोड, डॉ. बी. ए. रोड, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ६,९८,८८०/- | ६९८९.०० | १४०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ३. | उपकरप्राप्त इमारत क्र. ६४, एफ, साईकृपा, परळ गांव, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ३, ४६, ६६६/- | ३४६७.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ४. | उपकरप्राप्त इमारत क्र. १, कृष्णा बिल्डिंग, गोखले सोसायटी लेन, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ३, ३५, ३६९/- | ३३५४.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ५. | उपकरप्राप्त इमारत क्र. १३३ जी, मेघवाडी चाळ नं. २, डॉ. एस. एस. राव रोड, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ३,४७,६४०/- | ३४७६.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ६. | उपकरप्राप्त इमारत क्र. ७४ सी, विरचंद बिल्डिंग आचार्य दोंदे मार्ग, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम] | ३,४७,४१८/- | ३४७४.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ७. | उपकरप्राप्त इमारत क्र. ७३ ८१, हरी बिल्डिंग, डॉ. बाटलीवाला रोड, परेल, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ३,६१,६३५/- | ३६१६.०० | ८०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १० महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ८. | उपकरप्राप्त इमारत क्र. ४, कृष्णा बिल्डिंग, गोखले सोसायटी क्रॉस लेन, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [आमदार निधीचे काम ] | ३,४८,९२८/- | ३४८९.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०९/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २३/०९/२०२४ ते दि. २४/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा /मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ के.सा.बां.वि/रेल्वे /बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या नावावर दयावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजलाए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई- १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. २४/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारजी जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर) आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
12. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/658
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता फ [द] विभाग
मुं.इ.दु. ख. पु. मंडळ

जर तुमच्या कृतीमुळे कोणी महत्त्वकांक्षी होत असेल किंवा काही करण्यासाठी इच्छा होत असेल तर तुम्ही उत्तम नेते आहात.



- जॉन क्विन्सी ॲडम
अमेरिकेचे माजी राष्ट्रपती

वृत्तमानस

मुंबई, शुक्रवार, ६ सप्टेंबर २०२४

# मिळून सारे सुदृढ देश घडवू

बालमृत्यूचे वाढते प्रमाण हे आपल्या देशाला लागलेली कीड म्हणता येईल. पुरेसा आहार आणि योग्य आरोग्य सुविधा अभवी जर बालकांचा मृत्यू होत असेल तर ही आपल्या भारतासाठी नक्कीच भूषण वाढणारी बाब नाही. महाराष्ट्रामध्ये देखील काही वर्षांपूर्वी गाव पातळी चे आदिवासी पाड्यांपर्यंत ही समस्या पोहोचलेली. अजूनही या भागांमध्ये आरोग्य सुविधांच्या अभावे बालकांचे मोठे होण्याचे प्रमाण म्हणावे तेवढ्या प्रमाणात खाली उतरलेले नाही. परंतु त्यामध्ये काही प्रमाणात नक्कीच सुधारणा झालेली आहे हे देखील मानायला हवे. बालक सुदृढ राहिला तर त्याचे कुटुंब आणि पर्यायाने देश सुदृढ होईल असे हे या बालकांमध्ये साधं आणि सोपे गणित आहे. त्यामुळे सुदृढ महाराष्ट्र सुदृढ भारत घडवायचा असेल तर आपल्याला सुदृढ पालक घडवावे लागतील. त्याकरिता शासन स्तरावर सुरू असलेल्या विविध योजना खेड्यापाड्यावर जलद गतीने पोहोचवणे आवश्यक आहे. हे काम केवळ शासनावरच अवलंबून न ठेवता संस्था आणि या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने करायला हवे. केवळ शासनाच्या भरोशावरच या बालकांना ठेवता कामा नये तर धनवान व्यक्तीने देखील पुढे येऊन या समस्येचे निवारण करणे कामी प्रयत्न करायला हवे. तसे पाहता गेला काही काळ सतावत असलेल्या वाढत्या बालमृत्यूला काही प्रमाणात आळा घालण्यात यश आले असून ही बाब खरोखरच समाधानकारक मानली पाहिजे. एका अहवालानुसार २०२२ ते २०२३ म्हणजे मागील वर्षी राज्यात १७ हजार बालमृत्यूंची नोंद झाली होती. त्यामध्ये यंदा चांगलीच घट झाली असून, हा आकडा थेट १३ हजारांवर पोहोचला आहे. हे बालमृत्यू कमी करण्यासाठी सरकारी पातळीवर करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचे हे फलित मानावे लागेल. सार्वजनिक आरोग्य विभागाचा यामध्ये महत्त्वाचा वाटा असून, नियोजनबद्ध पद्धतीने त्यांनी हे मृत्यू कमी होण्यासाठी केलेले प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी होताना दिसत असले तरी त्यामध्ये सातत्य आवश्यक आहे. भारतात दर दोन मिनिटांनी सरासरी तीन अर्भकांचा मृत्यू होतो, असा अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या बालमृत्यू दरासंबंधात काम करणाऱ्या आंतरसंस्थांच्या गटाने यापूर्वी दिला आहे. पाणी, स्वच्छतेच्या सुविधा, पोषणमूल्य आणि प्राथमिक आरोग्य सुविधा यांच्या अभावामुळे हे मूत्यू ओढवतात, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. बालमृत्यूचे प्रमाण जगभरात भारतामध्ये सर्वाधिक आहे. दोन वर्षांपूर्वी सुमारे आठ लाख २० हजार अर्भक मृत्यू नोंदिवण्यात आले आहेत. गेल्या पाच वर्षांमधील हा नीचांकी दर आहे. तरीही ही संख्या जगाच्या तुलनेत पहिल्या क्रमांकाची आहे. चीनमध्येही अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. चीनमध्ये गेल्या वर्षी सुमारे तीन लाख ३० हजार अर्भक मृत्यू झाले. दरवर्षी दोन कोटी ५० लाख अर्भके जन्माला येतात. या तुलनेत गेल्या पाच वर्षांत बालमृत्यू दर खाली आला आहे. जगात जन्माला येणाऱ्या मुलांपैकी १८ टक्के मुले भारतात जन्म घेतात. पाच वर्षांखालील अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण हे गेल्या वर्षी प्रथमच जननदराच्या प्रमाणात आले आहे. तसेच नवजात अर्भकांसाठी देशभरात विशेष देखभाल केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. सातत्याने लसीकरणाच्या मोहिमा राबविण्यात येत असल्या तरी बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले नव्हते. गेल्या वर्षी नवजात अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण सहा लाख पाच हजार नोंदविण्यात आले. पाच ते १४ या वयोगटातील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण एक लाख ५२ हजार आहे. त्यात १९ लोकांचा मृत्यू होतो. शहरात रस्ते वेगवान होतांना दिसून येत आहे. काही दिवसांचे अंतर काही तासांत पार करता येत आहे. दळणवळणाच्या सोयी-सुविधा वाढल्या आहेत. मात्र याचबरोबर अपघाताचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. अपघाताचे प्रमाण केवळ एका राज्यात नाही, तर संपूर्ण देशभरात दररोज शेकडो अपघात होता. त्यात शेकडो जणांचा मृत्यू होतो, आणि हळहळ व्यक्त करुन, या अपघाताकडे दुर्लक्ष केल्या जाते. मानवी चुका कमी करण्यासाठी, अनेक कायदे करण्यात आले. मात्र कायदा करून त्यावर अंमलबजावणी होत नसेल, तर त्या कायद्याचा काय उपयोग? वाहनचालकांना कडक शिस्त लावणे गरजेचे आहे. कारण रस्त्यावर वाहनांची गर्दी असली तरी आपले वाहन जबरदस्तीने पुढे नेण्याच्या प्रयत्नात नेहमीच छोटे अपघात होतच असतात. तर कधी रात्रीच्या वेळी ट्रक, तसेच मोठ-मोठे सामान वाहतूक करणार्या गाड्या बेदरकारकपणे चालवल्या जातात. तर बर्याचवेळेस या चालकांनी मद्य प्राशन करून वाहन चालवतांना दिसून आले आहे. त्याचप्रकारे रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, धोक्यांच्या फलकांची उणीव, रात्री रस्त्याच्या पट्ट्याच न दिसणे, प्रखर दिव्यांचा वापर अशी अनेक कारणे आहेत. रस्ते चांगले झाल्याचा परिणामही काही ठिकाणी अपघात वाढण्यात झाला आहे. धोकादायक वळणे कमी करण्याचा प्रयत्न रस्ते बांधकाम विभागाने केलेला नाही. त्यामुळे अपघात वाढतात. रस्त्यांवर किती वेगाने वाहन चालविले पाहिजे, याची नियमावली असताना ती कुणीच पाळत नाही. अति घाई संकटात नेई, असा अनुभव पदोपदी येत असूनही त्यातून कुणी काही धडा घेत आहे, असे दिसत नाही. अपघाताला प्रामुख्याने काही मानवी चुका जबाबदार आहे. अति वेगाची नशा, हेल्मेट, सीट बेल्ट न वापरणे, धोकादायक ओव्हरटेकिंग / लेन कटिंग, मद्यपान करून गाडी चालविणे, गाडीत अनेक प्रवासी कोंबणे वा क्षमतेपेक्षा अधिक वजन वाहून नेणे, गाडी चालविण्याचे नीट प्रशिक्षण न घेणे वा वाहतूक नियमांचे अपुरे ज्ञान, चालकांवरील अतिताण, थकवा तसेच रस्त्यात कुठेही गाडी उभी करणे या कारणांमुळे बहुतेक अपघात होतात. त्याचबरोबर धुके किंवा मुसळधार पाऊस, प्रचंड उष्णता निर्माण झाल्याने टायर फुटणे, जनावर रस्त्यात आडवे येणे, पादचाऱ्यांची चूक, दरड कोसळणे, वाहतुकीची कोंडी यामुळे सुद्धा अनेक अपघात घडतात. मागील वर्षी दुचाकी वाहनांचे एकूण ६३ हजार अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये २५ हजार मृत्यू झालेले आहेत. चारचाकी वाहनांचे अपघात दुसऱ्या क्रमाकांवर असून, अशा अपघातांची संख्या २९ हजार असून, त्यात १० हजार लोक मृत्युमुखी पडले आहेत. तर, पादचारी अपघातग्रस्त होण्याच्या २१ हजार घटना घडल्या आहेत; ज्यात किमान १० हजार पादचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे ६७ टक्के अपघात हे सरळ रेषेत असलेल्या रस्त्यांवर झालेले आहेत. वळण असलेले रस्ते, खड्डेमय रस्ते, तीव्र उतार यांसारख्या रस्त्यांपेक्षा चार पट अधिक अपघात सरळमार्गी असलेल्या रस्ते किंवा महामार्गावर झाले आहेत. तीन-चतुर्थांश अपघात दिवसाच्या उजेडात झालेले आहेत; ज्यावेळी सूर्याचा लख्ख प्रकाश असतो, त्या प्रकाशात सर्वाधिक अपघात झाल्याचे समोर आल्यामुळे आश्चर्य वाटू शकते. दिवसा उजेडात झालेल्या अपघातांची संख्या ७४ टक्के एवढी आहे; तर त्यामध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या ७१ टक्के एवढी आहे. याउलट पाऊस, धुके व गारा पडत असताना झालेल्या अपघातांची संख्या १६ टक्के एवढी आहे. या अपघातांमुळे देशाच्या राष्ट्रीय जीडीपीच्या तीन टक्के सामाजिक आर्थिक नुकसान होते आणि मृत्यूमुखी पडलेल्यांपैकी ७० टक्के लोक १८ ते ४५ या वयोगटातील असतात, रस्ते अपघातांनी होणार्या मृत्यूच्या प्रमाणात २०२५ पर्यंत ५० टक्के घट होण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न करण्याचे आवाहन मधल्या काळात केंद्र सरकारने केले होते. मात्र आजची परिस्थिती पाहता, अपघाताचे प्रमाण आज जितके आहे, त्यापेक्षा अपघाताचे प्रमाण वाढलेले दिसून येऊ शकते. कारण प्रत्येकाला जीव महत्वाचा असला तरी, एकदा की मनुष्य रस्त्यावर उतरला की, तो नियमांना धरून चालत नाही. नियमांना धरून चालणारे, वागणारे थोडे लोक अपवाद आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आपल्याला कठोर उपाययोजना करावी लागणार आहे. पाणी केलेल्या कठोर उपाय योजनांची तेवढ्याच कठोरपणे अंमलबजावणी करावी लागणार आहे. ही सगळयांची जबाबदारी आहे असे समजून त्यामध्ये सर्वांनी उतरायला पाहिजे. बलवान बालक और बलवान देश असे समजून हे राज्य, हा देश, गाव पाड्यातील प्रत्येक कुटुंबतील बालकाला सुदृढ करण्यावर भर देवा लागेल.

# पिडीत महिला व बालकांच्या संरक्षणार्थ... नव्या कायद्यांचे पाठबळ!

महिला व बालकांच्या संरक्षणासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अत्याचारग्रस्त पीडित महिलांच्या संरक्षणासाठी गुन्हेगारांवर ‘कायद्याचा धाक’ राहणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने 1 जुलै 2024 पासून नवीन कायदे अंमलात आणले आहेत. या कायद्यांतील विविध कलमांन्वये महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे महिला व बालकांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याचे पाठबळ मिळणार आहे.

केंद्र शासनाने भारतीय दंड संहिता 1860, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 आणि भारतीय पुरावा कायदा 1972 या कायद्यांऐवजी भारतीय न्याय संहिता 2023, भारतीय पुरावा कायदा 2023 व भारतीय नागरी संरक्षण संहिता कायदा 2023 अंमलात आणला आहे. या सर्व नवीन कायद्यांची 1 जुलै 2024 पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे.

भारतीय न्याय संहितेमध्ये कलम 69 अन्वये महिलांवरील अत्याचाराबाबत आणखी एक नवीन कलम समाविष्ट केले आहे. एखाद्या व्यक्तीने लग्न, नोकरी किंवा बढतीचे खोटे आश्वासन देऊन एखाद्या महिलेशी लैंगिक संबंध ठेवल्याच्या गुन्ह्यांना नवीन कायद्यात स्थान मिळाले आहे. कामाच्या ठिकाणी पदोन्नतीच्या बदल्यात महिलांकडे लैंगिक सुखाची मागणी करण्यात येत असल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे या नवीन कलममुळे अशा पीडित महिलांना जलद न्याय मिळण्यास मदत होणार आहे. कामाच्या ठिकाणी महिलांविषयीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी या गुन्ह्यातील शिक्षेमध्ये दहा वर्षांपर्यंत कारावास आणि दंडदेखील होऊ शकतो.

तसेच कलम 70 (2) अन्वये अल्पवयीन 18 वर्षांखालील मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्यास गुन्ह्यातील प्रत्येक व्यक्तीने तो गुन्हा केल्याचे समजले जाईल. या गुन्ह्यांमध्ये जन्मठेपेची शिक्षा होती, ती आता फाशीच्या शिक्षेत रूपांतरीत करण्यात आली आहे. तसेच कलम 76 अन्वये एखाद्या महिलेस निर्वस्त्र करण्याच्या हेतून हल्ला करणे, किंवा अशा कृत्याला प्रवृत्त करतो, अशाविरूद्ध किमान 3 वर्ष शिक्षा ठोठावण्यात येवून ही शिक्षा दंडासह 7 वर्षापर्यंत वाढविण्यात येवू शकते.

कलम 77 अन्वये जर एखाद्या व्यक्तीने एखाद्या महिलेचे खासगी संभाषण ऐकले, तिचे खाजगी कृत्य पाहीले किंवा तिचे कपडे बदलताना पाहिले किंवा तिचे फोटो काढले व कोणी प्रसारित केले तर त्याला प्रथम दोषी ठरल्यावर कमीतकमी एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल, परंतु जी तीन वर्षांपर्यंत वाढू शकते आणि दंडही होऊ शकतो. तसेच दुसऱ्यांदा दोषी आढळल्यास किमान तीन वर्ष शिक्षा जी सात वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी वाढविण्यात येऊ शकते. यामध्ये दंडही होऊ शकतो.

बालकांवरील गुन्ह्यांमध्ये कलम 95 अन्वये गुन्हा करण्यासाठी एखाद्या मुलाला कामावर ठेवणे, त्याला गुन्हा करण्यासाठी गुंतविणे ही बाब समाविष्ट करण्यात आली आहे. अशा गुन्ह्यामध्ये दंडासह किमान तीन वर्ष कारावासाची शिक्षा होईल, ती 10 वर्षांपर्यंत दंडासह वाढविली जावू शकते. अशा प्रकरणात गुन्हा घडल्यास हा गुन्हा स्वत: मुलाला कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीने केला आहे, असे समजण्यात येणार आहे.

तसेच कलम 99 अन्वये जो कोणी कोणत्याही वयात एखाद्या मुलाला वेश्या व्यवसायाठी किंवा कोणत्याही व्यक्तीशी बेकायदेशीर लैंगिक संबंध ठेवण्याच्या हेतूने, कोणत्याही बेकायदेशीर आणि अनैतिक हेतुसाठी अशा मुलाचा ताबा घेतो, कामावर ठेवतो किंवा कोणत्याही बेकायदेशीर कारणासाठी त्याचा उपयोग करतो. अशा गुन्ह्यासाठी कारावासाची दंडासह किमान सात वर्षापर्यंत शिक्षा असून ही शिक्षा 14 वर्षांपर्यंत वाढविण्यात येवू शकते. अशाप्रकारे नवीन कायद्यांमध्ये महिला व बालकांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये नवीन कलम, आधीच्या कलमांमधील तरतूदीमध्ये बदल करून महिलांची सुरक्षीतता भक्कम करण्यात आली आहे.

- निलेश तायडे
विसंअ

# ... पुतळा ढासळेलच कसा?

कला आणि खेळामधे अपयश येणं हे आपण खूल्या दिलानं स्विकारायला हवे. आलेल्या अपयशाने खच्चून न जाता, अपयशाचे कारण शोधून आपण आपला आभ्यास, रियाज, सराव, प्रॅक्टीस चालू ठेवली पाहिजे. या मधे कल्पकता महत्त्वाची अन सर्वात महत्वाचे आपल्या कल्पकतेचे फौन्डेशन. एकदा पाया मजबूत झाला की पूतळा ढासळेलच कसा?

हे फौन्डेशन समजून घेणे फार महत्वाचे आहे. बुद्धाने केलेल्या सामाजिक क्रांती मुळे सम्राट अशोकाने राज्य क्रांती केली. भारताची ख्याती आणि कला सर्वदूर जगभर पसरली. जगतगुरू तुकोबाराय आणि संत साहित्याने महाराष्ट्रात नव्याने सामाजिक क्रांती केली अन् या वैश्वीक विचारांच्या फौन्डेशन वर छत्रपती शिवाजी महाराजनीं स्वराज्य स्थापन केले. या स्वराज्याच्या भक्कम पायाचा माहात्मा फुलेंनी शोध घेतला आणि शिक्षणाची, अन्याया विरुद्ध, भ्रष्टाचारा विरुद्ध लढण्याची सत्यशोधक क्रांती केली. याच फौन्डेशनवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वतंत्र्य, बंधूता आणि न्याय या वैश्वीक विचारांवर आधारीत लोकशाही प्रस्थापीत केली. अशा "simply amazing" भारतीय इतिहासाचे, राष्ट्रपुरुषांचे, संत-महात्म्यांचे, विविध विचार अन् विचार शैलींचे कार्य साहित्य आणि कले द्वारे रिप्रेझेन्ट होतात, आभ्यासले जातात. या कलाकृती प्रेरणा देण्याचे, दिशा दाखवण्याचे, अत्त दिप होण्याचे कार्य करतात. मग, माझ्या महाराष्ट्राच्या 'कसलेल्या' मातीत, माझ्या राजांच्या स्वराज्यात, माझ्याच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ढासळतोच कसा? फौन्डेशनचा विचार करायला हवा..

फौन्डेशन चा विचार करताना.. समता, स्वतंत्र्य, बंधूताआणि न्याय या वैश्वीक अन् संविधानिक मूल्यांवर आधारीत हे फौन्डेशन आहे का हे तपासले पाहिजे. वरवर पाहता हे कोणाला पटणार नाही. कोणी म्हणेल शिल्पकार हा कमी वयाचा आणि अनुभव नसलेला आहे. कोणी म्हणेल मान्यता होती किंवा नव्हती. कोणी म्हणेल साहित्य कमी दर्जाचे वापरले. कोणी म्हणेल भ्रष्टाचार झाला. कोणी म्हणेल ज्यांच्या हाताने उद्घाटन झाले तेच व त्यांचा पक्ष जबाबदार. कोणी म्हणेल निर्मिती व्यवस्था काय करत होती? कोणी दुखः व्यक्त करतील, कोणी जाब विचारतील, कोणी थातूरमातूर उत्तरे देतील, कोणी १०० वेळा माफी मागतील, कोणी नवीन पूतळा उभारण्याचे आश्वासान देतील..

आधी प्रत्येकाने आपल्या आतलं आर्मेचर, स्ट्रक्चर तपासले पाहिजे. कलाकार, कला संस्कृती, रसीक-प्रेक्षक मायबाप सगळे समृद्ध आणि कसलेले असतील तर एक मायकेल एंजेलो ऐन विशीत 'पियेत्ता' घडवतो.. आपला रेहमान ऐन विशीत संगीताची जादू दाखवतो. तेंडूलकर क्रिकेट चा देव बनतो.. अन् अशी अनेक उदाहरणे देता येतील. पण मोठ्या बाता मारून उपयोग नाही कारण वारं खूप जोरात वाहतय! एका विशिष्ठ कोनातून.. या "शिव-विरोधी" वाऱ्याला ओळखले पाहिजे.. या शिव-विरोधी वाऱ्या मूळे या वेळेस पुतळा ढासळला.. याच शिव- विरोधी वाऱ्याने पुण्यामधे एके काळी आपल्या शिवाजी महाराजांचा पुतळा उभारूच नये म्हणून तूफान माजवले होते. त्याला भक्कम पणे तोंड देत करमरकरांनी घडवलेला महाराजांचा जगदविख्यात अश्वारूढ पुतळा साकार झाला. कलावंत पण कसलेला होता अन् कलेला प्रोत्साहन देणारे, रसद पुरवणारे रसीक मायबाप, राजे अन् मावळे पण कसलेले होते...

समाजाने, महाराज्यांच्या रयतेने, यंत्रणेने खऱ्या अर्थाने, कला रसीक, कला प्रेमी, कलेला प्रोत्साहन देणारे "कसलेले" मायबाप व्हायला पाहिजे. अगदी बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराजां प्रमाणे, श्रीमंत पंतप्रतिनिधी अन् आपल्या सर्वांचे आश्रयदाते छत्रपती शाहू महाराज यांच्या सारखे.

एकदा का अशा 'कसलेल्या' मायबापांनी क्वालीटीचे स्टील पुरवले, त्याला गरजेचे व साजेसे बजेट दिले, कलावंताला कलानिर्मिती साठी लागणारे कला शिक्षण, अनुभव अन् सर्वात महत्वाचे म्हणजे कलानिर्मिती साठी लागणारा कालावधी अन् स्वातंत्र्य दिले.. प्रत्येकाने स्वतःच्या तनामनात भिनलेले "फुले-शाहू-आंबेडकर" दिले की मग बघा निर्माण झालेला माझ्या महाराजांचा पुतळा ढासळेलच कसा?

(लेखक स्वतः दृश्य रचनाकार, कला - इतिहास अभ्यासक आणि उपयोजीत कलेचे प्राध्यापक आहे)

- प्रा. डॉ. समीर प्रभाकर आगळे

# मुंबईकराचा लोकलमधून जीवघेणा प्रवास...!

मध्य रेल्वेच्या कल्याणपुढील प्रवास बेभरवशाचा झाला आहे. लोकल वाहतूक उशिराने होणे हे आता गृहीत धरले जाते. रोज किमान १५ ते २० मिनिटे जास्तीत जास्त अर्धा तास लोकल वाहतूक उशिरा असणे, हे नित्याचेच आहे. त्यामुळे ठाण्यापासून पुढे कल्याणपर्यंत आणि कल्याणपासून पुढे कर्जत-कसारा मार्गावर प्रवाशांची होणारी गर्दी नित्याचीच बाब आहे. यातील डोंबिवली स्थानक हे अत्यंत धोकादायक झाले आहे. ठाण्यापासून डोंबिवलीपर्यंत सकाळच्या वेळेत प्रवाशांची मुंबईकडे येणाऱ्या गाडीमध्ये घुसण्यासाठी होणारी गर्दी चिंतेचा विषय आहे. याच मार्गावर डोंबिवली-कल्याणच्या दरम्यान प्रवासी ट्रेनमधून पडण्याच्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी अंबरनाथजवळ एक प्रवासी गर्दीच्या वेळेत लोकलमधून पडला. रेल्वे प्रवासी संघटनांनी हा रोजचा जीवघेणा प्रवास थोडासा सुसह्य करण्यासाठी आपल्या मागण्यांचे निवेदन रेल्वेला सादर केले आहे, परंतु दरवर्षी रेल्वे प्रवासी संघटनांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम होते. ठाण्यापासून पुढच्या प्रवासासाठी रेल्वेने प्रवाशांना कधीचेच वाऱ्यावर सोडले आहे. ठाण्यापुढील प्रवासात कर्जत आणि कसाऱ्याच्या दिशेने रेल्वेची दुपदरी लाईन टाकण्याची गरज आहे. परंतु या कामासाठी जमिनी ताब्यात घ्याव्या लागतील. याशिवाय पालिका आणि रेल्वे यांच्यातील समन्वयाचा अभाव यामुळे हे काम कठीण झालेले आहे. कल्याणमधील कारशेडचा प्रश्नही अनेक वर्षांपासून खोळंबलेला आहे. विठ्ठलवाडी आणि कल्याणदरम्यान एसी डीसीचा प्रश्न सुटायला जवळपास वीस वर्षांचा कालावधी लागला. या तुलनेने किरकोळ कामासाठी इतका कालावधी जात असेल तर रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती, सिग्नल यंत्रणेची दुरुस्ती, फाटकांच्या जागी पूल बनवणे या मोठ्या कामांना किती वेळ लागेल हे सांगता येत नाही.

कल्याण कारशेडचा प्रश्न हा मध्य रेल्वेवरील सगळ्यात मोठा प्रश्न आहे. हा प्रश्न सुटल्यास कल्याणपुढील कर्जत आणि कसारा या दोन्ही मार्गावर लोकल ट्रेनसाठी स्वतंत्र मार्गिका तयार करणे शक्य होऊ शकते. संध्याकाळच्या वेळेत मुंबईहून कल्याणच्या दिशेने होणारी वाहतूक पाहता कल्याण स्टेशनवर लोकल गाड्या थांबवून ठेवणे आणि मेल एक्सप्रेस गाड्यांना पुढे पाठवणे यातील लोकल प्रवाशांचा खोळंबा रोखता येईल. मेट्रो आणि स्मार्ट सिटीच्या कामांमुळे मध्य रेल्वेच्या मुख्य स्थानकाबाहेर वेगाने विकासकामे होत आहेत. या कामादरम्यानच रेल्वेच्या कामाचेही नियोजन व्हायला हवे. अन्यथा स्थानकांच्या विस्तारीकरणाचा प्रश्न पुढील काळात बिकट होईल. कल्याणपासून कसाऱ्यापर्यंत टिटवाळ्याच्या पुढील स्थानकात शौचालय, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, फलाटांवरील शेड, अस्वच्छता, तिकीट खिडक्यांचा अभाव, रेल्वे पुलांची कमतरता, रेल्वेचा फुटबोर्ड आणि फलाट यामधील अंतर असे अनेक प्रश्न आहेत. भारताच्या एकूण उत्पन्नामध्ये रेल्वेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा वाटा आहे. यातही रेल्वेच्या उत्पन्नामध्ये मुंबईतील लोकल ट्रेनपासून होणारे उत्पन्न सर्वाधिक आहे. तरीही मुंबई आणि ठाणेकरांच्या वाट्याला पुरेशा सोयीसुविधा येत नाहीत. डोंबिवली स्थानकातून गर्दीच्या वेळी लोकल ट्रेन पकडणे हे मरणाच्या दारात जाऊन येण्यासारखे आहे. गर्दीच्या वेळेत सकाळी कर्जत, कसारा, कल्याण येथून सुटणाऱ्या गाड्या डोंबिवलीत येण्याआधीच संपूर्ण खचाखच भरून जातात. हीच स्थिती संध्याकाळच्या वेळेत घाटकोपर ठाण्याच्या आधी होते. दुसरीकडे मध्य रेल्वेचे कोलमडलेले वेळापत्रक या त्रासात भरच घालते. पश्चिम रेल्वेच्या तुलनेत मध्य रेल्वेला नेहमीच सापत्न वागणूक मिळत आली आहे. पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेनचा विलंब हा आठ ते दहा मिनिटांवर असतो. जोरदार पाऊस झाल्यास हा विलंब पंधरा मिनिटांवर पोहोचतो. मात्र मध्य रेल्वेवर विलंबाचे हेच प्रमाण अर्धा तास ते एक तास असू शकते. मध्य रेल्वेला जोडलेली ट्रान्स हार्बर सेवा, हार्बर लाईन आणि घाटकोपरजवळचे मेट्रो स्टेशन यामुळे मध्य रेल्वेवर प्रवासी वाहतूक संख्या कमालीची वाढत आहे.




मुंबई-ठाण्याहून कल्याणच्या पुढे टिटवाळा बदलापूर या भागात स्थायिक होणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. कल्याण-डोंबिवली परिसर याआधीच नागरीकरणाने भरलेला आहे.

त्यामुळे सर्वसामान्य मुंबई-ठाणेकर कल्याणच्या पुढे ढकलला जात आहे. दूरचे जाऊ द्या, अगदीच ठाणे स्थानकातही ज्यादा वेगाने जाणाऱ्या फलाट क्रमांक पाचवर पुरेशी शेड नाही. रेल्वेने बांबूच्या सहाय्याने ताडपत्री टाकून तात्पुरती शेड तयार केली आहे. हे तेच ठाणे स्थानक आहे, ज्या स्थानकात भारतातील पहिली रेल्वे आगगाडी मुंबईहून येऊन विसावली होती. या ऐतिहासिक स्थानकाची स्थिती भयंकर आहे. सध्या मुख्यमंत्री हे ठाण्याचे आहेत, तरी ठाणे स्थानक जैसे थे आहे. कल्याण हे एक महत्त्वाचे स्थानक आहे. मुंबईहून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या बहुतेक गाड्या कल्याणात थांबतात, परंतु कल्याणातील बहुतेक फलाटांवर पुरेशी शौचालये नाहीत.गर्दूल्याचा भीती प्लॅट फॉर्म क्र 6-7 वरील छपरच गायब पावसाळ्यापुरती वरती प्लास्टिक ताडपत्री टाकून ठेवली आहे कसारा मार्गावरील टिटवाळ्याच्या पुढील स्थानके तर लोकल वाहतुकीची आहेत का, असा प्रश्न पडावा. पुण्याकडे जाणाऱ्या कल्याण ते कर्जत मार्गावर बदलापूर स्थानकात पुरेशी शेड नाही. स्थानकांमध्ये ही स्थिती असताना रेल्वेच्या तांत्रिक नियोजनाबाबतही उदासीनता आहे. थोडासा पाऊस पडला तरी ओव्हरहेड वायरमध्ये स्पार्क होणे, सिग्नल यंत्रणेत बिघाड होणे, रेल्वे रुळांवर पाणी साचणे या बाबी नित्याच्याच आहेत. त्यामुळेच मध्य रेल्वेचा प्रवास जीवघेणा होत चालला आहे,याकडे सरकारने लक्ष द्यावे.

- शिवाजी विठ्ठल चौगुले,
कल्याण

## पत्र मानस

### 'इमर्जन्सी' चित्रपटाचे प्रदर्शन कधी

अभिनेत्री व भाजपा खासदार कंगना राणावत म्हणजे जणू वादविवादच होय. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खा.कंगना राणावत यांचा एकमेकांवर असलेला राग संपूर्ण राज्याने पाहिला आहे. पण आता ती भूमिका तसेच निर्मिती करीत असलेला 'इमर्जन्सी' या ऐतिहासिक चित्रपटाला सेन्सॉर बोर्ड प्रमाणपत्र देण्यास जाणूनबुजून उशीर होत आहे असेच आता वाटत आहे. 'इमर्जन्सी' हा चित्रपट माजी पंतप्रधान स्व इंदिरा गांधी यांच्या जीवनावर बनवलेला आहे. माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधीचे नेतृत्व कणखर होते. पण काही प्रमुख शीख संघटनेने या चित्रपटाच्या प्रदर्शनाला विरोध केला आहे. त्याचबरोबर न्यायालयाने देखील सेन्सॉर बोर्डाच्या कामात हस्तक्षेप करायला अजूनही तयार नाही. म्हणूनच देशात पंजाब वगळून इतरत्र ठिकाणी हा महत्त्वपूर्ण चित्रपट प्रदर्शन करता येईल का याचा किमान विचार करायला हवा होता असे वाटते.

- संजय गंगाराम साळगांवकर

## जाहीरात फलकांना पालिकेकडून लेखी परवानगी घेणे बंधनकारक

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोणतीही जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 244 तसेच महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम-2022 नुसार महापालिकेची आगाऊ लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे.पुढील कार्यवाही करणे व संबंधित जाहिराती काढून टाकण्याचे अधिकार संबंधित सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने नवी मुंबई क्षेत्रात राजकीय, धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे तात्पुरते पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स, कटआऊट इ. तसेच गणेशोत्सव व नवरात्रौत्सव कालावधीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात लावण्यात येणारे वाणिज्यिक स्वरुपाचे जाहिरात फलक व कमानी इ. प्रकारच्या जाहिराती लावण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयात विहीत नमुन्यातील अर्ज, वाहतुक पोलीस यांचेकडील जाहिरात फलक लावणेच्या जागेकरीता ना-हरकत प्रमाणपत्र तसेच जाहिरात फलकावर प्रदर्शित करावयाच्या जाहिरातीच्या / माहितीच्या मजकूराची संगणकीकृत प्रिंटआऊट इ. बाबींच्या पुर्ततेसह आवश्यक शुल्काचा भरणा करून नियमानुसार परवानगी घेण्यात यावी.

# ऐन गणेशोत्सवात दिव्यात बेकायदा बांधकामे जोरात

■ शिंदेंच्या ठाण्यात बेकायदा बांधकामांना जोर; दिवा प्रभाग समिती आयुक्तांची डोळेझाकच

■ मोजक्याच बांधकामांवर होते कारवाई

■ अनधिकृत बांधकामांवर दिव्यातील कोणत्या मोठ्या नेत्यांचा वरदहस्त की सहाय्यक आयुक्तांचा ?

सुशांत पाटील
■ दिवा/ठाणे

सध्या देशात आणि राज्यात गणेशोत्सवाची लगबग आहे. आता काही महिन्यांमध्ये विधानसभा निवडणुकासुद्धा येऊ घातल्यात. यामध्ये सर्व राजकीय पक्ष या येऊ घातलेल्या निवडणुकीचा आणि गणेशोत्सवाचा पुरेपूर फायदा येथील बिल्डरांनी उचलेला दिसतो. हीच अवस्था कळवा, मुंब्रासारख्या शहरांचीसुद्धा आहे.

ऐन गणेशोत्सवात दिव्यात अनधिकृत इमारतींच्या बांधकामांची जणू स्पर्धा सुरू झाल्याचे चित्र निर्माण झालयं. ठाणे महापालिका हद्दीत मागील काही महिन्यांपासून अनाधिकृत बांधकामांना पायबंद घालण्यात आला होता. नवे आयुक्त सौरभ राव यांनी देखील गणेशोत्सवाच्या काळातही अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

विशेष म्हणजे हे सगळी बांधकाम बिनधास्त चालू आहेत. भाबडे दिवेकर या गोड गैरसमजुतीत आहेत कि दिव्याचा विकास होणार? पण खरं तर विकास दिव्याचा होतोय कि स्थानिक बिल्डरांचा होतोय तेच कळत नाही. यामध्ये प्रशासनाचा धाक स्थानिक बिल्डरांवर नक्की आहे कि नाही हाच यक्षप्रश्न आहे. मागील काही महिने अनाधिकृत बांधकामांना अंकुश लावण्यात पालिकेला यश आले होते. परंतु आता पुन्हा आचारसंहितेच्या आड अनाधिकृत बांधकामे उभी राहत असल्याचे चित्र खास करुन कळवा, मुंब्रा, दिवा भागात दिसत आहे.

भाग 1



दिवा आगासन रोड ग्लोबल शाळा आणि दिवा पोलिस, बीट क्रमांक 4 समोरच बांधकाम

दरम्यान आयुक्त सौरभ राव यांनी देखील मागील महिन्यात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. परंतु असे असतांनाही केवळ किरकोळ कारवाई केली जात असून आजही अनेक ठिकाणी अनाधिकृत बांधकामे उभी राहत असल्याचे चित्र दिसत आहे.

कारण याचा उदाहरण म्हणजे दिव्यात जागोजागी लागलेले बॅनर. दिव्यात ठिकठिकाणी येथील स्थानिक बिल्डरांनी ग्राहकांना गणपती स्पेशल भेटवस्तू देऊन आपल्याकडे आकर्षित करण्याची जणू स्पर्धाच लावलेली आहे असे दिसते. गल्लीबोळात 'बिल्डर्स आणि डेव्हलपर्स' नावाने असे चकाचक ऑफिस दिसतायत. या गणेशोत्सवा काळात 'मस्त चाललंय आमच' असाच रुबाब येथील बिल्डर लॉबीचा आहे.




दिवा साईबाबा नगर दिवा दातीवली रोड स्मशानभूमी लगतचे बांधकाम

दिवा प्रभागातील लोकसंख्या भरमसाठ वाढत असून त्यामुळे पायाभूत सुविधांवर ताण निर्माण झाला आहे. पिण्याचे पाणी, नाले, गटारांची व्यवस्था, रस्त्यांची कामे, वीज, शिक्षण आणि आरोग्य सुविधांचाही पत्ता नसलेल्या या भागात स्वस्त घरांचा पर्याय मात्र आहे. महापालिकेच्या परवानगीशिवाय चार ते पाच मजल्यांच्या इमारती उभ्या राहत आहेत. कोणत्याही परवानगीशिवाय चार ते पाच मजल्यांच्या टोलेजंग इमारती बिनदिक्कत उभ्या केल्या जात आहेत. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाकडून या सर्वांकडे डोळेझाक केली जात आहे.

मुख्यत: दिव्यात मुंब्रा कॉलनी, आगासन रोड, साबे गाव, सदाशिव दळवी नगर, श्लोक नगर,नारायण भगत नगर या भागांमध्ये जोरात बांधकाम चालू आहेत. बघू या बांधकामांवर कोण वचक बसवतो ते. ते येणारा काळाचा ठरवेल. ठाणे महापालिका क्षेत्रातील दिव्यात सध्या अनेक अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. तिच अवस्था कळवा, मुंब्रा या शहरांची आहे. दिवा हे अनधिकृत बांधकामांचे जणू हॉटस्पॉट ठरत आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून अवघड होऊन बसला आहे.

## पोलिसांना मिळाली आपटेची टिप त्याच्याच बायकोकडून

■ कल्याण

मालवण घटनेतील फरार शिल्पकार जयदीप आपटे याला कल्याण पोलिसांनी अटक केले असून त्याला सिंधुदुर्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सिंधुदुर्ग पोलिसांसह कल्याणचे पोलीस देखील जयदीप आपटेच्या शोधात होते. याप्रकरणात आता एक महत्वाची अपडेट समोर आली असून जयदीप घरी येणार असल्याची टीप त्याच्या पत्नीनेच दिल्याची माहिती समोर आली आहे. जयदीपच्या पत्नीने जयदीप कल्याणमध्ये येणार असल्याची माहिती दिली होती, मात्र तो कधी व कसा येणार याबाबत काहीच माहिती नव्हती. या माहितीच्या आधारे कल्याणचे डीसीपी सचिन गुंजाळ यांनी कल्याण रेल्वे स्टेशन व जयदीप आपटे राहत असलेल्या इमारतीच्या परिसरात दोन पथक नेमून सापळा रचला होता. जयदीप आपटे आपल्या इमारतीच्या परिसरात येताच कल्याण पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. आपटे घरी भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना त्याच्याच पत्नीने दिली. जयदीप आपटे पत्नी नशिगंधा आणि कुटुंबीयांना भेटण्यासाठी येत होता. त्यासंदर्भात त्यानं पत्नीला कळवलं होतं. निशिगंधाने याबाबत पोलिसांना कळवलं होतं. आपटे कुटुंबियांनी याबाबत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

## पालिका पाणी पुरवठा देयक भरण्यासाठी आता 'क्यू आर' सुविधा उपलब्ध

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाणी देयके भरण्याकरिता यापूर्वीच ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि सध्याच्या काळात विविध देयके भरण्याकरिता नागरिकांकडून मोठया प्रमाणात होणारा विविध पेमेंट ॲपचा वापर लक्षात घेउन नवी मुंबई शहरातील नागरिकांच्या पाणी देयकावर क्यू आर कोड (QR CODE) सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सुरु होती. त्यास अनुसरुन नुकत्याच वितरीत करण्यात आलेल्या माहे जून-जुलै 2024-2025 च्या पाणी देयकांवर क्यू आर कोड (QR CODE) छापण्यात आले असून आता नागरिक पाणी देयकांवर असलेले क्यू आर कोड स्कॅन करुन अगदी सहजपणे आपली पाणी देयके भरणा करु शकतात.

माहे जून-जुलै 2024-2025 च्या पाणी देयकावर क्यू आर कोड (QR CODE) छपाई करण्यात आला आहे. प्रत्येक पाणी देयकावर ग्राहकनिहाय स्वतंत्र क्यू आर कोड (QR CODE) छपाई करण्यात आलेला आहे. सदर क्यू आर कोड (QR CODE) गुगल लेन्सने स्कॅन केल्यावर एक लिंक नागरिकांच्या स्क्रीनवर येईल. त्यावर क्लिक केले असता मोबाईलमध्ये उपलब्ध असणा-या पेमेंट ॲपची यादी दर्शविली जाईल. त्यातून योग्य त्या ॲपची निवड करुन नागरिक आपले पाणी देयक भरणा करु शकतात. त्यामुळे नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात व कार्यालयात न जाता आहे त्या ठिकाणाहून आपले पाणी देयक भरणा करता येउ शकते.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तसेच मोरबे धरण ते कळंबोली दरम्यान असलेल्या मुख्य जलवाहिनीवरील ग्रामपंचायतींकडील पाणी देयक थकीत असलेले ग्राहक यांच्याकडील थकीत पाणी देयक वसूली करण्याच्या दृष्टीने 'अभय योजना' सद्यस्थितीत सुरु आहे. त्या अंतर्गत थकीत पाणी देयक ग्राहकांकरिता एकूण थकीत पाणी देयकामधील विलंब शुल्क व दंडात्मक रक्कमेवर ७५% सूट देण्यात आलेली आहे.




**कल्याण :** *"भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतार दिनी" आज महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात अनधिकृत बांधकाम विभागाचे उपआयुक्त अवधुत तावडे यांनी "भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी" यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित उपआयुक्त प्रसाद बोरकर, सहाय्यक आयुक्त स्नेहा करपे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच उपस्थित असलेले नागरीक, समाजबांधव व महापालिका कर्मचारी वर्गानेदेखील "भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी" यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.*

**नवी मुंबई :** *"शांती, समता व अहिंसा यांची शिकवण देणारे महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी अवतारदिन जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात व विलास मलुष्टे आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.*




## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे, लिली अपार्टमेंट पहिला मजला, पारसी अगरी लेन, टेंभी नाका, ठाणे.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**एस.आर. एन. क्रमांक : THN/12047/18/24**
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ACC-II/636/2024**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : मिशन प्रमोट रीसर्च ट्रस्ट ..... बाबत.**
**न्यासाचा पत्ता :** रामसागर भूमिधर यादव, सी 101, गोल्डन फ्लीस 2 & 3 हाउसींग, सॉक. लिमिटेड, मीरा भी रोड, ओल्ड पेट्रोल पम्पच्या समोर, क्वीन्स पार्क, मीरा रोड (ई.), ठाणे.
**अर्जदार : रामसागर भूमिधर यादव,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | रोख | १०००/- |

**(अ) जंगम मिळकत:- रोख रु. १०००/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

**(ब) स्थावर मिळकत:- रोख रु. ०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त )**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०२/०९/२०२४ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**ठाणे**

## कल्याण-डोंबिवली, टिटवाळ्यातील 27 गावात साकारणार नवीन उद्याने !

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात लहान मोठी मिळून सुमारे 65 उद्याने आहेत. तसेच एकुण 17 मैदाने देखील नागरीकांसाठी उपलब्ध आहेत. तथापि सद्याच्या असलेल्या सुमारे 20 लाख लोकसंख्येच्या तुलनेत जनमानसासाठी विरंगुळ्याचे मोठे केंद्र असलेल्या उद्यानांची संख्या वाढविणे जास्त गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेली



उद्याने व मैदाने सुसज्ज ठेवणे ही देखील काळाची गरज आहे. या दृष्टीकोनातून अस्तित्वातील मैदाने व उद्याने विद्यार्थी, लहान मुले, नागरीक यांच्यासाठी सुस्थितीत उपलब्ध राहवीत याकरीता महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी महापालिकेच्या यावर्षीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. तसेच महापालिकेला गतवर्षी शहर सौंदर्यीकरणांतर्गत रु. 10 कोटीचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. या रक्कमेतून उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने टिटवाळा येथे एका सुसज्ज अशा उद्यानाचे काम सुरु केले आहे. त्याचबरोबर कल्याण (पश्चिम) येथील राणी लक्ष्मीबाई उद्यान, कल्याण पूर्वेतील खडेगोळवली येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उद्यान, डोंबिवली (पूर्व) येथील गजबंधन पाथर्ली उद्यान तसेच डोंबिवली (पश्चिम) येथील मिनाताई ठाकरे उद्यान नुतनीकरणाचे काम देखील हाती घेण्यात येत आहे. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या संकल्पनेतून आता महापालिका क्षेत्रातील प्रत्येक परिसरात सुसज्ज बगीचा तयार करण्याचा उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाचा मानस आहे.

## पालिका शाळेचे शिक्षक आणि विजेत्या फुटबॉलपटू विद्यार्थिनींचा शिक्षक दिनानिमित्त आयुक्त डॉ. कैलास शिंदेंच्या हस्ते सन्मान

■ नवी मुंबई




आपल्या जीवनाला आकार देणा-या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा दिवस असून जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत नामांकित शाळांच्या संघांवर मात करीत नवी मुंबई पालिका कोपरखैरणेगाव येथील शाळेने जे यश संपादन केले आहे त्या विद्यार्थ्यांचा व त्यांना घडविणा-या शिक्षकांचा सन्मान आज शिक्षकदिनाचे औचित्य साधून करताना आनंद होत असल्याचे मत नवी मुंबई पालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी व्यक्त केले. नवी मुंबईपालिका शाळा क्र. 36, कोपरखैरणेगांव येथे शिक्षकदिनानिमित्त आयोजित विशेष समारंभप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. याप्रसंगी शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त सुनिल काठोळे, माजी नगरसेवक शिवराम पाटील व अनिता पाटील, कार्यकारी अभियंता संजय खताळ, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, केंद्र समन्वयक .पाल, मुख्याध्यापिका दिपाली संखे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**के.ई.एम. हॉस्पिटल, परेल**
**क्र. केईएम/२७३४/ एईएमई दिनांकित ०५/०९/२०२४**
**ई-निविदा सूचना**

| | | |
|---|---|---|
| विभाग | : | विभाग केईएम हॉस्पिटल |
| बोली मागविणारा क्र. | : | महाटेंडर आयडी: २०२४_ एमसीजीएम_ १०८११३५ |
| विषय | : | केईम हॉस्पिटल मध्ये यूजी-पीजी, न्यूरोलॉजी, मेडिसीन, पॅथलॉजी सेंट्रल लायब्ररी, फिजीएटरी, फार्माकॉलॉजी आणि विविध विभागांमध्ये लॅन, व्हाय-फाय सिस्टीमचे एसआयटीसी. |
| बोली विक्री | : | दिनांक ०६/०९/२०२४ रोजी १६.०० वा. पासून दिनांक १३/०९/२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| संकेतस्थळ | : | http://mahatenders.gov.in |
| ए) संपर्क अधिकारी | : | सहा अभियंता (एम आणि ई) केईएम |
| बी) नाव | : | श्रीमती मनीषा जाधव/ श्री. प्रफुल खुपते |
| सी) दूरध्वनी | : | ०२२२४१०७७६८/ ७७९९ |
| डी) ई-मेल आयडी | : | ae02me.kem@mcgm.gov.in |

पीआरओ/११९०/जाही/२०२४-२५

सही/-
अधिष्ठाता (केईएमएच)

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

**ई- निविदा**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे म्हाडा / सिडको / पी.डब्ल्यू.डी/सी. पी. डब्ल्यू. डी / एम. आय. डी. सी./बी.पी.टी./एम. ई. एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१फॉर्ममध्ये (टक्केवारी दर सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

| अनु. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | २% सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम [विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | कालावधी करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | उपकरप्राप्त इमारत क्र. ३८-३८ डी, जानकी निवास, महात्मा ज्योतिबा मार्ग, मुंबई या इमारतीचे दुरस्ती काम करणे [ मंडळ निधीचे काम ] | ९,९८,०६५/- | ९,९८१.०० | २०,०००.०० | ५९०.०० | दि.११/०९/२०२४ ते दि. २३/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २४/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| २ | उपकरप्राप्त इमारत क्र. १३३, अलीभाई ट्रस्ट, गोविदजी केणी मार्ग, दादर (पूर्व) मुंबई फ/दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरस्ती काम करणे [ मंडळ निधीचे काम ] | ५,३०,२४०/- | ५,३०२.०० | ११,०००.०० | ५९०.०० | दि.११/०९/२०२४ ते दि. २३/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २४/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ३ | उपकरप्राप्त इमारत क्र. १७४-१८०, दानावाला बिल्डींग, डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मुंबई फ/दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरस्ती काम करणे [ मंडळ निधीचे काम ] | ५,२५,७४९/- | ५,२५८.०० | ११,०००.०० | ५९०.०० | दि.११/०९/२०२४ ते दि. २३/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. २४/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
२. को-या निविदा मादा /भू.म.पा./ सा.बां. विभाग के.सा.बां. विल्वे बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंव्हा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य समांच्या नोंदणाकृत व पात्र स असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या नावावर यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजलाए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मुंबई - १२. बांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळे को-या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद नि दि. २५/०९/२०२४ ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ.दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
७. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेद असणे आवश्यक आहे.
९. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
१०. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.
११. मागविण्यात आलेली निविदा सन २०२२-२३ च्या एसएसआर दर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
१२. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/659

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता फ [द] विभाग
मुं. इ. दु. व पु. मंडळ

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## भंडारदरा धरण 'आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय' म्हणून ओळखले जाणार

**अहमदनगर :** नगर जिल्ह्याच्या उत्तर भागाची भाग्यरेखा असणारे आणि अभिजात निसर्ग सौन्दर्याचे कोंदण लाभलेले अकोले तालुक्यातील भंडारदरा धरण आता "आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय" म्हणून ओळखले जाणार आहे. राज्य सरकारने या धरणाचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला असून नामांतराबाबतचा शासन आदेश जलसंपदा विभागाने जारी केला आहे. यामुळे अकोले तालुक्यातील जनतेची अनेक दिवसांची मागणी मान्य झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नदीवर भंडारदरा येथे ब्रिटिश राजवटीत १९१० मध्ये धरण बांधण्यास सुरवात झाली. १९२६ मध्ये धरणाचे बंधकाम पूर्ण झाले. १०डिसेंबर १९२६ रोजी या धरणाचे लोकार्पण तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर लेसस्ली विल्सन यांच्या हस्ते करण्यात आले.या भंडारदरा धरणाला तत्कालीन ब्रिटिश सरकारने 'विल्सन डॅम' तर त्या मागच्या जलाशयाला ' लेक आर्थर हिल' असे नाव दिले होते. आर्थर हिल हे तेव्हाचे मुख्य अभियंता होते.



### म ह त्त्वा चे

## कुंडमळा परिसरात फिरायला गेलेले दोघे बुडाले

**मावळ :** चिंचवड गाव येथील श्रेया सुरेश गावडे (वय १७) आणि रोहन ज्ञानेशवर ढोंबरे (वय २२) असे वाहून गेलेल्या तरुण तरुणीचे नाव आहे. श्रेया व रोहन यांच्यासह सात ते आठ मित्र मावळातील कुंडमळा परिसरात फिरण्यासाठी गेले होते. दरम्यान हे सर्वजण कुंडमळ्याच्या पाण्यात उतरले होते. त्यातील श्रेया व रोहन याना पाण्याचा अंदाज न आल्याने ते दोघे वाहून गेले. सोबत असलेल्या मित्रांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. यावेळी सर्व मित्रांनी आरडाओरड केल्याने परिसरातील नागरिक धावून आले. सदर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. यानंतर तळेगाव आंबी एमआयडीसी पोलीस आणि मावळ वन्यजीव रक्षक बचाव पथक घटनास्थळी पोहचून शोधकार्य सुरू केलं आहे. एकीकडे प्रशासनाने इंद्रायणी नदीच्या पाण्यात उतरण्यास मनाई केली असताना ही पर्यटक अश्या पध्दतीने आपला जीव धोक्यात टाकून पाण्यात उतरत आहे.

## कशेडीतील दुसरा बोगदा वाहतुकीसाठी खुला

**खेड :** मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्याय असणाऱ्या घाटातील दुसरा बोगदा गुरुवार, ५ सप्टेंबरपासून वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महामार्गाच्या पाहणीदरम्यान ३ सप्टेंबरपूर्वी हा बोगदा वाहतुकीस खुला करून चाकरमानी दोन्ही बोगद्यातून मार्गस्थ होतील, असे जाहीर केले होते. मात्र, ढिम्म प्रशासन व ठेकेदाराने मुख्यमंत्र्यांचे आश्वासन फोल ठरवले आहे. त्यानंतर दोन दिवसांनी का होईना, आता गुरुवारपासून दोन्ही बोगद्यांतून वाहतुकीसाठी खुला होत आहे. मुंबईकडून गोव्याच्या दिशेने वाहतूक करण्यासाठी तयार करण्यात येणारा हा कशेडी बोगदा गणेशोत्सव कालावधीत मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी वापरण्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गणेशोत्सव कालावधीत या बोगद्यातील तीन मार्गिकांपैकी एक मार्गिका सुरू करण्यात येणार आहे. या दृष्टीने ठेकेदार कंपनी व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी अपूर्ण कामांच्या पूर्ततेसाठी धावपळ सुरू केली.

# सत्तारांची मध्यरात्रीची मध्यस्थी फळाला
## जरांगेंची फोनवरुन फडणवीसांसोबत चर्चा

प्रतिनिधी
■ जालना



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची रात्री उशिरा भेट घेतली होती. दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल तीन तास चर्चा झाली. यांच्या चर्चेदरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही फोनवर चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटल्यानंतर आता अब्दुल सत्तार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेणार असल्याची माहितीदेखील सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जरांगे पाटील विरुद्ध सरकार वादामध्ये तोडगा निघतो का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये सत्ताधारी महायुतीला राज्यात मोठ्या प्रमाणात पराभव सहन करावा लागला होता. राज्यातील अनेक मतदारसंघावर मराठा आंदोलनाचा परिणाम झाल्याचे या माध्यमातून दिसून आले. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा आंदोलकांचा रोष कमी करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरू केले असल्याचे दिसून येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंत्री अब्दुल सत्तार यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्याची चर्चा सध्या सुरू झाली आहे. तसेच अब्दुल सत्तार यांची घेतलेला हा पुढाकार फळाला जातो का? याबाबत देखील चर्चा सुरू झाली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत फोनवर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत आमच्यात चर्चा झाली असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत आणि मराठा आरक्षणाबाबत काही ना काही तरी तोडगा काढावा लागेल, असे मत अब्दुल सत्तार यांनी देखील यावेळी व्यक्त केले. त्यामुळेच या दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेचे नेमके काय फलित निघते? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या आणि मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आज मंत्रिमंडळ बैठकीत देखील चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यापूर्वीच अब्दुल सत्तार यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यामुळे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विधानसभा निवडणुका लांबल्या असल्या तरी देखील मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेला कालावधी संपायाला आता काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे राज्य सरकार काय निर्णय घेते, हे पहावे लागेल.

मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर मंत्री अब्दुल सत्तार हे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेणार आहे. या दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली याचा तपशील ते मुख्यमंत्र्यांना देण्याची शक्यता आहे. तसेच याबाबत काही तोडगा निघतो का? याची देखील चाचपणी सरकारच्या वतीने करण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा सरकार प्रयत्न करत असल्याचे देखील सूत्रांनी म्हटले आहे.

बुधवारी रात्री दहा वाजता मंत्री सत्तार 100 गाड्यांचा ताफा घेऊन अंतरवाली सराटीत आल्याने,राजकीय जाणकारांमध्ये चर्चा सुरू झाली होती. दरम्यान, सत्तार व जरांगे यांच्यामध्ये या वेळी चर्चा झाली. चर्चेचा तपशील समजू शकला नाही .मंत्री सत्तार यांचा ताफा आंतरवालीत रात्री दाखल झाला, त्यावेळी जरांगे पाटील नुकसानीच्या पाहणीसाठी बाहेरगावी गेले होते. त्यामुळे सत्तार यांना दीड तास प्रतीक्षा करावी लागली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री अब्दुल सत्तार व जरांगे पाटील यांच्या भेटीमुळे अनेक तर्क- वितर्क लावले जात होते. रात्री उशिरापर्यंत दोन्ही नेत्यांची बैठक सुरू होती.

# जिवंतपणी मिळणाऱ्या 'या' मरणयातना इव्हेंटबाज सरकारने प्रत्यक्षात बघाव्यात
### वडेट्टीवार, राऊतांचे सरकारवर टीकास्त्र



प्रतिनिधी
■ गडचिरोली

गडचिरोली जिल्ह्यातील दाम्पत्यावर प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे त्यापेक्षाही वाईट वेळ आली आहे. दोन चिमुकल्यांचे मृतदेह आपल्याच खांद्यावर घेऊन पंधरा किलोमीटर पायपीट करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. आता या घटनेचा व्हिडिओ समोर आाल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. यावर आता राजकीय पडसाद देखील उमटले आहेत.

वेळेवर रुग्णवाहिक न मिळाल्यामुळे या गरीब आदिवासी दाम्पत्याला आपल्या लेकराचे मृतदेह आपल्याच खांद्यावर घेऊन जावे लागले. या दुःखात भर टाकण्याचे काम केले गेले. त्यामुळे आता या घटनेवरून राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे.

गडचिरोली जिल्ह्याचा काया पालट करणार असल्याचा दावा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. मात्र, त्यांचा दावा फोल ठरला असल्याची टीका उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. आरोग्यव्यवस्थेच्या माध्यमातून जिल्ह्याचा काया पालट करण्यापेक्षा खाण उद्योग आणि त्यावर आधारीत आर्थिक व्यवहार आपल्या हातात असावे, यासाठीच हा जिल्हा स्वतःकडे ठेवला असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. त्यासाठी वेगळया जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. मात्र आजही आदिवासी हा जीवनासाठी संघर्ष करत आहे. आरोग्यवस्था नाही, रस्ते नाही, शाळेची व्यवस्था नाही, त्यामुळे आजही गर्भवती महिलांना देखील झोळीत टाकून प्रवास करावा लागत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

या संदर्भात विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील एका पोस्टच्या माध्यमातून राज्य सरकावर टीका केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री असलेला हा जिल्हा. हेलिकॉप्टरने विधानसभा मतदारसंघ पिंजून काढणारे महायुतीतील कॅबिनेट मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचा हा मतदारसंघ. दोघेही महाराष्ट्रभर रोज इव्हेंट घेऊन आम्हीच कसा विकास करू शकतो हे सांगत असतात. दोघांनी एकदा जमिनीवर उतरून आपल्या गडचिरोली जिल्ह्यात लोकं कसे जगतात, जिवंतपणी त्यांना मिळत असलेल्या मरणयातना एकदा या इव्हेंटबाज सरकारने प्रत्यक्ष जाऊनही बघावे.'

## एकाच महिलेला किती संधी देणार?
### चाकणकरांविरुध्द ठोंबरेंचा अजित पवारांना खडा सवाल

प्रतिनिधी
■ पुणे

विधानपरिषदेतील राज्यपाल नियुक्त आमदारांच्या मुद्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एक नवा वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादीच्या प्रवक्त्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी या प्रकरणी स्पष्ट मत मांडत पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांना विधान परिषदेवर पाठवण्यास तीव्र विरोध केला आहे. तुम्ही एकाच महिलेला किती पदे देणार? असा कळीचा प्रश्न त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस राज्यपाल नियुक्त आमदारांच्या कोट्यातून आपल्या 3 नेत्यांना विधान परिषदेवर पाठवणार आहे. त्यात राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी खासदार आनंद परांजपे व सिद्धार्थ कांबळे यांना संधी दिली जाण्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर रूपाली ठोंबरे पाटील यांनी चाकणकर यांच्या नावावर आक्षेप नोंदवला आहे. या प्रकरणी त्यांनी थेट अजित पवार यांच्याकडे न्यायाची याचना केली आहे. यामुळे राष्ट्रवादीपुढे बाका प्रसंग उभा राहिला आहे.

## सुवर्ण मंदिराच्या प्रतिकृतीला शीख समुदायाचा विरोध

प्रतिनिधी
■ पुणे



गणेशोत्सवानिमित्त दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून विविध देखावे साकारले जातात. याच पार्श्वभूमीवर पुण्यातील सदाशिव पेठेतील छत्रपती राजाराम मंडळाकडून यंदा अमृतसर येथील सुवर्ण मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. मात्र, शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीनं याला विरोध केलाय. अमृतसर येथील शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचे अध्यक्ष हरजिंदर सिंग धामी यांनी एक्सवर पोस्ट करत हे शीखांच्या भावना भडकवणारं कृत्य असल्याचं म्हटलय.

यासंदर्भात छत्रपती राजाराम मंडळाचे अध्यक्ष युवराज निंबाळकर यांना विचारलं असता ते म्हणाले, "त्यांनी छत्रपती राजाराम मंडळाला कोणताही विरोध केलेला नाही. त्यांनी कॅम्प येथील जो गुरुद्वारा आहे त्यांना यासंदर्भात विचारणा केलीय की, अशा गोष्टी घडताय तरी तुम्ही ते आम्हाला सांगत नाहीत. मात्र, ही प्रतिकृती उभारण्याअगोदर मी स्वतः दोन महिन्यांपूर्वी मंदिर प्रशासनाकडे जाऊन याबाबत माहिती दिली होती." तसंच यासंदर्भात आम्ही 40 गुरुद्वारांची भेट घेतली असून त्यांचंही सहकार्य आम्हाला लाभल्याचं निंबाळकर यांनी सांगितलं.

पुढं निंबाळकर म्हणाले, "शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचे शिष्टमंडळ शुक्रवारी (6 सप्टेंबर) आम्ही तयार केलेल्या सुवर्ण मंदिराच्या प्रतिकृतीची पाहणी करतील. त्यानंतर त्यांनी सांगितलेल्या सूचनांचं आम्ही पालन करणार आहोत." दरम्यान, या अगोदर छत्रपती संभाजीनगर, उल्हासनगर तसंच कोलकाता येथे देखील सुवर्ण मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली होती.

## लोकसभा निवडणुकीत पाठिंबा देणाऱ्या खोरीप नेत्यांना भेट देण्यास काँग्रेस नेत्यांची टाळाटाळ

प्रतिनिधी
■ नागपूर

लोकसभा निवडणुकीत संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) ने महाविकास आघाडीला जाहीर नी स्वर्थिपणे पाठिंबा दिला होता. शरद पवार यांना भेटून हा निर्णय सांगितला होता. त्यानंतर राज्यभरात महाविकास आघाडीच्यो उमेदवारांचा प्रचार केला स्थानिक पातळीवरील पदाधिकारी कार्यकर्ते यांनी सुद्धा पक्षाच्या आदेशानुसार महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला होता त्यामुळे महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशात रिपब्लिकन पक्षाचा (खोरिपा) सुद्धा वाटा आहे.

मात्र आता विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला (खोरिपा) जागा द्याव्या लागतील म्हणून काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले हे चर्चा करण्यास टाळाटाळ करीत आहेत पक्षाच्या नेत्यांनी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या भेटीसाठी प्रयत्न केले मात्र त्यांनी अद्याप भेट दिली नाही त्यामुळे आता त्यांना रिपब्लिकन पक्षाची (खोरिपा)गरज नसेल तर स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याची तयारी सुरू करावी लागेल असे रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) चे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार उपेंद्र शेंडे यांनी सांगितले आहे

शनिवारी नागपूर येथे आमदार निवासात रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) च्या प्रमुख पदाधिकारी यांची महत्त्वाची बैठक पार पडली ह्या वेळी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या सोहळयाच्या तयारी बाबतही चर्चा झाली

विधानसभा निवडणुकीबाबत स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी सोहळयात करण्यात येणार असल्याचे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे यांनी सांगितले.

## कदम आणि ठाकरेंमधील तेढ कायम?

प्रतिनिधी
■ सांगली



विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी हे आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांच्या हस्ते सांगली जिल्ह्यातील पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे लोकार्पण झाले. या कार्यक्रमाला राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, शरदचंद्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे देखील उपस्थित आहेत. मात्र कार्यक्रम पत्रिकेवर उद्धव ठाकरे यांचे नाव नसल्याने या बाबतची चांगलीच चर्चा रंगली आहे. सांगली लोकसभा निवडणुकीवरून देखील राज्यभरात चांगलीच चर्चा रंगली होती.

महाविकास आघाडी विरोधात बंड पुकारत विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणूक लढवून विजय मिळवला. त्यांना त्यासाठी आमदार विश्वजीत कदम यांची देखील मोलाची साथ लाभली असल्याचे बोलले जाते. त्यामुळे सांगली लोकसभेवरुन महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडते की काय? अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर सांगलीतून अपक्ष म्हणून विजयी झालेले काँग्रेसचे बंडखोर विशाल पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यामुळे हा वाद मिटला, असे बोलले जात होते. मात्र आता हा वाद खरेच मिटला का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय. त्याला कारणही तसेच आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत देखील सांगलीतील मतदार संघांवर उद्धव ठाकरे गट दावा सांगत आहे. तर विश्वजीत कदम आणि विशाल पाटील यांनीही विधानसभेसाठी कंबर कसली आहे. आज सांगलीमध्ये होणाऱ्या कार्यक्रमाला महाविकास आघाडीतील सर्व बडे नेते उपस्थित असताना उद्धव ठाकरे यांचे कार्यक्रम पत्रिकेतही नाव नसल्यामुळे याबाबत चर्चा सुरू झाली आहेत.

याबाबत विश्वजीत कदम यांनी स्वतः स्पष्टीकरण दिले आहे. आपण बारा दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांची त्यांच्या मातोश्री निवासस्थानी भेट घेतली होती. तसेच त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रणही दिले होते. मात्र, वैयक्तिक कामानिमित्त या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकणार नसल्याचे त्यांनी आधीच सांगितले होते. महाविकास आघाडीमध्ये कुठलाही वाद नाही. उद्धव ठाकरे यांनी मला चांगला प्रतिसाद दिला असल्याचे विश्वजीत कदम यांनी सांगितले.

## बेपत्ता अक्षयचा मृतदेह माडखोल धरणात सापडला
### चिठ्ठीत मुंबईतील एका पोलीस उपनिरीक्षकासह नऊ जणांची नावे

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

गाडीच्या अपघातानंतर सतत पैशांसाठी होणाऱ्या जाचाला कंटाळून कोलगाव भोमवाडी येथील अक्षय जनार्दन साईल (वय २८) या युवकाने माडखोल धरणात आत्महत्या केल्याचे गुरूवारी उघडकीस झाले. अक्षय मंगळवार पासून बेपत्ता होता. त्याची दुचाकी, चप्पल हे माडखोल धरण परिसरात आढळून आल्याने त्याचा शोध घेण्यात येत होता. अखेर त्याचा मृतदेह आज आढळून आला.

दरम्यान या आत्महत्येच्या प्रकारानंतर कोलगाव ग्रामस्थ आक्रमक झाले असून अक्षयच्या आत्महत्येस जबाबदार असलेल्या व चिठ्ठीत उल्लेख असलेल्या संशयितांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे. पोलिसांकडून उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचा काम सुरू होते.

कुटुंबाने पोलिसात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांकडून शोध सुरू होता. त्यातच अक्षयची दुचाकी चप्पल हे माडखोल धरण परिसरात आढळून आले. त्याने बेपत्ता होण्यापूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. अखेर अक्षयचा मृतदेह सापडल्यानंतर सर्वच गोष्टीचा उलगडा झाला.

## गुणवत्तेसह शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी जे पी नाईकांचे महत्त्वाचे योगदान - देशपांडे

प्रतिनिधी
■ पुणे



युनेस्कोचे आणि भारत सरकारचे शिक्षण सल्लागार या नात्याने तसेच कोठारी आयोगाच्या माध्यमातून, सदस्य सचिव डॉ. जे. पी. नाईक यांनी वेळोवेळी गुणवत्तेसह शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा मुद्दा अधोरेखित केला. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, मौनी विद्यापीठासह राष्ट्रीय पातळीवर अनेक संस्था स्थापन करुन स्वातंत्र्योत्तर भारताच्या शिक्षणाला त्यांनी नवी दिशा दिली. त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशभर यशस्वीपणे अंमलात आणायचे असेल तर आवश्यक त्या स्पष्टतेसह पारदर्शी प्रक्रिया राबवून संबंधित घटकाना नियमितपणे प्रशिक्षित करावे लागेल, असे मत जडण-घडण मासिकाचे मुख्य संपादक आणि शिक्षण क्षेत्राचे अभ्यासक डॉ. सागर देशपांडे यांनी येथे व्यक्त केले.

भारतीय शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षणतज्ञ, पद्मभूषण डॉ. जे. पी. नाईक यांची ११७ वी जयंती आणि शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष आणि माजी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष उदय शिंदे, संदस्य सचिव प्रा. डॉ. जयसिंग कळके, प्रा. डॉ. शर्मिष्ठा मटकर, डॉ. दीपक वेडे हे उपस्थित होते. प्रारंभी डॉ. देशपांडे यांच्या हस्ते जे.पी.नाईक यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. डॉ. कळके यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली आणि संस्थेच्या शिवापूर येथील ग्रामीण महिला विकासिनीच्या पुनर्उभारणीसाठी पाच लाख रुपयांचा धनादेश प्रमुख अतिथी डॉ.सागर देशपांडे यांच्या हस्ते डॉ. अडसूळ यांना सुपूर्द केला.

डॉ. देशपांडे यांनी आपल्या भाषणात डॉ. नाईक यांच्या संबंधीची प्रेरणादायी माहिती आणि उदाहरणे विषद करून मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य, कौशल्याधारित शिक्षण, भविष्यातील नवे प्रवाह यासह आनंददायी शिक्षणासाठी आपण काय प्रयत्न करू शकतो, याचे अत्यंत मार्मिक उदाहरणांसह विवेचन केले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळालाच पाहिजे, पण त्याच वेळी महापालिकांच्या मराठी माध्यमाच्या शाळा राजरोसपणे बंद पडू लागल्या आहेत, याची समाज म्हणून आपण दखल घेतली पाहिजे, असेही तेम्हणाले. डॉ. अडसूळ यांनी अध्यक्षीय समारोप करताना शिक्षण ही तत्वज्ञानाची गतीशील आणि मानसशास्त्राची कृतिशील बाजू असल्याचे स्पष्ट केले. मदन दळवी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले तर मेधा सोनसळे यांनी आभार मानले. यावेळी भारतीय शिक्षण संस्थेच्या विविध विभागातील प्रमुख आणि शिक्षक, निवृत्त प्राचार्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## मनसेच्या वतीने वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या सर्व डॉक्टर बंधूंचा गौरव

प्रतिनिधी
■ पंढरपूर

काळ वेळ न पाहता जे होतात रुग्णसेवेत रुजू सांगा डॉक्टर तुमचे उपकार कोणत्या शब्धात मोजू या वाक्याप्रमाणे पंढरपूर शहर व तालुक्यात गेली अनेक वर्ष अविरतपणे वैद्यकीय सेवा बजावून लोकांचे प्राण वाचवून हजारो लोकांना जीवनदान देऊन त्यांचे कुटुंब आनंदी आणि सुखी राहावे यासाठी अविरतपणे काम करणाऱ्या माणसातील देव माणूस असलेल्या पंढरपूर येथील सर्व डॉक्टर्स बंधूंचा गौरव व सन्मान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी व्यासपीठावर विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, आय.एम.ए अध्यक्ष डॉ. शितल शहा, निमा अध्यक्ष डॉ. अमरसिंह जमदाडे, डेंटल असोसिएशन अध्यक्षा डॉ. सौ.ऋचा खूपसंगीकर, होमिओपॅथी असोसिएशन अध्यक्षा डॉ. सौ.जयश्री शिनगारे, पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. महेश सुडके, तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले उपस्थित होते. याप्रसंगी डॉक्टर्स बंधूंशी संवाद साधताना मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी सुरुवातीला सर्व डॉक्टर्स बंधूंचे आभार मानून आपला परिचय करून देताना शालेय जीवनापासून आतापर्यंतच्या राजकीय प्रवासाला उजाळा देत मनसेच्या वतीने पंढरपूर शहरात केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली.



यानंतर पंढरपूर येथील सर्व डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करत असणाऱ्या सर्व डॉक्टर्स मंडळींचा भगवी शाल, फेटा बांधून पुष्पहार घालून व मनसे गौरवचिन्ह देऊन मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते सन्मान करून मनसे गौरव सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि डॉक्टर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक 4 सप्टेंबर 2024 रोजी पंढरपूर येथील लिंक रोड वरील हॉटेल चतुर्थी हॉल येथे करण्यात आले होते. यावेळी मनसे जिल्हा अध्यक्ष प्रशांत गिड्डे, , संतोष कवडे, गणेश पिंपळनेरकर, अनिल बागल, ॲड. संदीप रणनवरे, ॲड. पराग जहागीरदार, उद्योजक सुहास शिर्के, आदित्य फत्तेपूरकर, अनिल सप्ताळ,शशिकांत पाटील यांच्यासह सर्व डॉक्टर्स संघटनांचे पदाधिकारी आणि डॉक्टर्स बंधू उपस्थित होते.

***अभिजित पाटील यांच्या नियुक्तीने धोत्रेंची वाढली ताकद***

*मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या कामाची दखल घेऊन राज्यातील मनसेचा पहिला उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर त्यांना जनतेचा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींचा वाढता पाठिंबा मिळू लागला. यामध्ये मोठी भर पडली ती विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांची यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत दिलीप धोत्रे यांची ताकत व अभिजीत पाटील यांची ताकत एकवटुन धोत्रे यांचे पारडे जड झाल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.*

## T-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात मंगोलिया 10 धावांवर ऑलआऊट

**बंजी :** सिंगापूरविरुद्ध मंगोलियन संघ 10 धावांत ऑलआऊट झाला आहे. आंतरराष्ट्रीय T-20 मधील ही सर्वात कमी धावसंख्या आहे. गेल्या वर्षी आयल ऑफ मॅनचा संघही याच धावसंख्येवर ऑलआऊट झाला होता.T-20 विश्वचषकाच्या आशियाई पात्रता सामन्यात सिंगापूरने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने मंगोलियन संघाला 10 षटकांत 10 धावांत ऑलआऊट केले. सिंगापूरने 11 धावांचे लक्ष्य अवघ्या 5 चेंडूत एक विकेट गमावून पूर्ण केले. हा सामना फक्त 65 चेंडूंपर्यंत चालला.17 वर्षीय लेगस्पिनर हर्ष भारद्वाजने 3 धावांत 6 बळी घेतले. तसेच अक्षय पुरीने 2, राहुल आणि रमेश यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.मंगोलियन संघ यंदा तिसऱ्यांदा 20 पेक्षा कमी धावसंख्येवर ऑलआऊट झाला आहे. यापूर्वी 31 ऑगस्ट रोजी हाँगकाँगविरुद्ध 17 धावांवर आणि मे महिन्यात जपानविरुद्ध 12 धावांवर संघ ऑलआऊट झाला होता.



## श्री गणेश आखाड्याच्या कुस्तीपटूंचे यश



प्रतिनिधी
■ मुंबई

श्री गणेश आखाड्यामध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व मिरा भाईंदर महानगर पालिका आयोजित २०२४-२५ च्या जिल्हा स्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत यजमान श्री गणेश आखाड्याच्या कुस्तीपटूंनी शानदार यश संपादन केले. त्यांच्या पेहेलवानांनी एकूण २७ पदके मिळवली. त्यामध्ये १५ सुवर्ण, ८ रौप्य, ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदक विजेत्या कुस्तीपटूंना वस्ताद वसंतराव पाटील, वैभव माने, कोमल देसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांक मिळवलेले १५ पेहेलवान विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या क्रीडा अधिकारी श्रीमती दिपाली जोशी, मिरा भाईंदर क्रीडा विभाग समन्वयक जेरविन अल्मेडिया उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बलराज बागल यांनी केले

## बीसीसीआयच्या वार्षिक बैठकीत 'सचिव निवड' हा मुद्दा नाही

### नवीन सचिव निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा घेणार

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सचिव निवडीचा अजेंडा समाविष्ट केलेला नाही. आता नव्या सचिवाची निवड विशेष सर्वसाधारण सभेत (SGM) होणार आहे.

या संदर्भात मंडळाने सर्व राज्य संघटनांना गुरुवार 5 सप्टेंबर रोजी नोटीस पाठवली आहे. त्यानुसार बोर्डाची वार्षिक बैठक 29 सप्टेंबर रोजी बंगळुरू येथील फोर सीझन हॉटेलमध्ये होणार आहे. या कालावधीत, बंगळुरूमध्ये नव्याने बांधलेल्या राष्ट्रीय क्रिकेट केंद्राचेही उद्घाटन केले जाईल. शेवटची AGM 25 सप्टेंबर 2023 रोजी गोव्यात झाली होती.



***शहा आयसीसीचे अध्यक्ष झाल्यास हे पद रिक्त होईल***

*अधिसूचनेनुसार, एजीएमच्या अजेंड्यात बीसीसीआय सचिवांच्या निवडीचा उल्लेख नाही. या बैठकीत नव्या सचिवांची निवड होईल, अशी अपेक्षा होती. जय शहा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) अध्यक्ष बनले आहेत. त्यामुळे भारतीय मंडळाचे सचिव पद रिक्त होणार आहे. अशा स्थितीत बीसीसीआयला 31 डिसेंबरपूर्वी नवीन सचिवांची निवड करावी लागणार आहे. विशेष सर्वसाधारण सभेत (SGM) नवीन सचिवांची निवड होणार असल्याचे सांगण्यात येत आहे*

यावेळी देखील 2 पानांच्या अजेंड्यामध्ये 18 मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे. अजेंड्यात बीसीसीआयच्या आयसीसीच्या प्रतिनिधीची नियुक्ती, क्रिकेट समित्या, स्थायी समिती आणि पंच समितीच्या नियुक्त्या समाविष्ट आहेत. तसेच वार्षिक अर्थसंकल्पाची स्वीकृती अजेंड्यावर आहे.

नव्या बीसीसीआय सचिवपदाचा मुद्दा आताच घाईने विचारात घेण्याची आवश्यकता क्रिकेट बोर्डाला वाटत नाही. कारण त्यासाठी ३१ डिसेम्बरपर्यंतचा अवधी बोर्डाकडे आहे. त्यामुळेच सचिव निवडीचा मुद्दा २९ सप्टेंबरच्या वार्षिक बैठकीच्या अजेंड्यावर घेतला गेला नसावा असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## नंदिनी, अमृता, श्रेयश, तन्मय, गणेश, दिनेश ठरले सर्वोत्तम लिफ्टर



प्रतिनिधी
■ मुंबई

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रायगड बेंचप्रेस, क्लासिक आणि इक्विप या स्पर्धेत नंदिनी उमप, अमृता भगत, श्रेयश जाधव, तन्मय पाटील, गणेश तोटे, दिनेश पवारने अनुक्रमे आपापल्या गटात सर्वोत्तम लिफ्टरचा मान मिळवला. रॉयल गार्डन, मुद्रे, कर्जत येथे सदर स्पर्धा पार पडली. सुधाकर परशुराम घारे (माजी उपाध्यक्ष तथा सभापती, शिक्षण आरोग्य व क्रीडा समिती रायगड जिल्हा परिषद,) यांच्या सौजन्याने कर्जत शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस कमिटीने ही स्पर्धा आयोजित केली होती. महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई यांचे मोलाचे सहकार्य स्पर्धेला लाभले. या स्पर्धेच्या क्लासिक सब ज्युनिअर मुलींच्या गटात नंदिनी उपर .(बॉडी लाईन जिम खोपोली), जूनियर मुलींच्या गटात अमृता भगत (पॉवर हाऊस क्लब, खोपोली) ह्या "किताब विजेत्या झाल्या. सब ज्युनिअर क्लासिक मुलांच्या गटात श्रेयश जाधव (आयर्न मॅट जिम, खोपोली), जूनियर मुलांच्या गटात तन्मय पाटील (संसार जिम, पेण), सीनियर क्लासिक पुरुष गटात गणेश तोटे (फिट ऑन जिम, पनवेल) आणि मास्टर्स (४९,५०,६०, आणि ७० वर्षावरील स्पर्धक) स्पर्धेत दिनेश पवार (स्पार्टन जिम, लौजी खोपोली) हे किताब विजेते ठरले. सांघिक विजेतेपद जी व्ही आर जिम, कर्जत यांना मिळाले. उप विजेतेपद हनुमान व्यायाम शाळा, पेण यांनी पटकावले तर तृतीय क्रमांक बॉडी लाईन जिम, खोपोली यांना मिळाला. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोगल, खजिनदार राहुल गजरमल, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर आणि सचिव अरुण पाटकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. स्पर्धेत मुंबईचे गोपीनाथ पवार, सुरेश धुळप, जितेंद्र यादव, अंकुश सावंत, प्रशांत सरदेसाई, साहिल उतेकर, पुण्याचे विजय पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.

## मध्य रेल्वेने 4 महाकाय होर्डिंग हटविले

### १४ होर्डिंगचे आकार केले कमी

प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर (पूर्व) येथे काही दिवसांपूर्वी पेट्रोल पंपावर महाकाय होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत मोठी जीवित हानी झाली होती. त्यानंतर महापालिकेने रेल्वे प्रशासनाला महापालिकेचे जाहिरात धोरण व नियम याप्रमाणे होर्डिंग लावण्याचे आदेश दिले होते. मात्र रेल्वे प्रशासनाने महापालिकेचे धोरण मान्य न करता मनमानी केली. अखेर प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मध्य रेल्वेने नाईलाजाने ४ मोठे होर्डिंग हटविले. तर १४ होर्डिंगचे आकार कमी केले आहेत, अशी माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मध्य रेल्वेच्या हवाल्याने दिली आहे. मात्र पश्चिम रेल्वेने मागितलेली माहिती स्पष्ट नसल्याचे सांगत कारवाईची माहिती दिली नाही.

गलगली यांनी, मध्य रेल्वेकडे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. मध्य रेल्वेच्या वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक बी. अरुण कुमार यांनी केलेल्या कारवाईची यादी दिली. या यादीत १८ पैकी ४ होर्डिंग कायमस्वरूपी निष्कासित करण्यात आले आहे. यात सँडहर्स्ट रोड ( ३२०० फूट), चुनाभट्टी ( ३२०० फूट), टिळक नगर येथील २ ठिकाण ( १५९८ फूट ) आहेत. मेसर्स रोशन स्पेस यांची २ तर मेसर्स पायोनियर आणि मेसर्स अलख यांची प्रत्येकी १ होर्डिंग आहेत.

ज्या होर्डिंगचा आकार कमी केला त्यात वाडी बंदर, भायखळा येथील ३, चुनाभट्टी येथील ५, सुमन नगर येथील ३ आणि टिळकनगर येथील २ ठिकाणचा समावेश आहे. १४ होर्डिंगचा आकार कमी केला आहेत त्यात ७ देवांगी आऊटडोअर, २ मेसर्स रोशन स्पेस, २ मेसर्स झेस्ट एंटरप्राइज, मेसर्स वॉललोप, मेसर्स कोठारी आणि मेसर्स नुकलेसईट्स यांची प्रत्येकी १ होर्डिंग आहेत.

दरम्यान, पश्चिम रेल्वेचे जन माहिती अधिकारी सौरभ कुमार यांनी गलगली यांनी मागितलेली माहिती स्पष्ट नसल्याचे सांगत कारवाईची माहिती दिली नाही, असे अनिल गलगली यांनी सांगितले. मात्र त्यांनी मध्य रेल्वेच्या उपाययोजनावर आनंद व्यक्त केला आहे. यामुळे भविष्यात घाटकोपरसारख्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होणार नाही.

## शिवसेनेकडून राज्यातील 50 हजार कार्यकर्ते 1 कोटी महिलांशी भेटून संवाद साधणार!

### प्रवक्ते संजय निरुपम यांची माहिती

■ मुंबई

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर आता शिवसेनेकडून राज्यात 'लाडकी बहिण कुटुंब भेट' अभियान राबवले जाणार आहे. या अभियानात शिवसेनेचे ५० हजार कार्यकर्ते १ कोटी महिलांना भेटून संवाद साधणार आहेत, अशी माहिती शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी दिली.

लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'लाडकी बहिण कुटुंब भेट' अभियानाचा शुभारंभ होणार आहे. राज्यातील ७० ते ८० विधानसभा मतदार संघांवर शिवसेनेने लक्ष केंद्रीत केले आहे. या मतदार संघात प्रत्येक कार्यकर्ता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लाडकी बहिण योजना बंद होणार नाही, असे हमीपत्र घेऊन १० लाडक्या बहिणींच्या घरी पोहोचेल, असे निरुपम यांनी सांगितले. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या दिवशी शिवसेना कार्यकर्ते लाडक्या बहिणींच्या घरी जातील. दररोज किमान ५ लाख आणि महिनाभरात ६० लाख लाडक्या बहिणींच्या घरी या अभियानातून संपर्क साधला जाईल, असे निरुपम म्हणाले.

## स्टुडिओ रिफ्युएलच्या 'कृष्णार्थ'मध्ये पद्मश्री अनुप जलोटांचे गायन

प्रतिनिधी
■ मुंबई

भजनसम्राट आणि पद्मश्री अनुप जलोटा यांनी मुंबईतील इस्कॉन येथे अनेक तास सतत भजने गाऊन उपस्थितांना भक्तिमय केले. स्टुडिओ रिफ्युएलने आयोजित केलेल्या "कृष्णार्थ" या कार्यक्रमात अनुप जलोटा यांनी त्यांच्या भजनातून श्रीकृष्णाच्या कर्तृत्वाचे वर्णन केले. सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर आणि घनश्याम वासवानी यांनीही यावेळी उपस्थिती दर्शवली. स्टुडिओ रिफ्युएलचे सीईओ इंडिया चॅप्टर सचिन तैलंग आणि सीईओ दुबई चॅप्टर रमन छिब्बर, कुमार यांनी दोन्ही महान गायकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या भक्तीमय संगीत संध्याकाळात अनूप जलोटा यांनी आपल्या भजनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. भजनसम्राट अनुप जलोटा यांनी ऐसी लागी लगन, इतनी शक्ती हमने देना दाता अशी भक्तिगीते गाऊन सर्वांना भजन गुंजायला भाग पाडले.यावेळी पद्मश्री अनूप जलोटा यांनी स्टुडिओ रिफ्युएल आणि त्याच्याशी संबंधित संपूर्ण टीमचे आभार व्यक्त केले .




## गणेशोत्सवास विरोध करणाऱ्या विकासकास मनसेचा दणका

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवास विरोध करणाऱ्या जवाहर नगर चा SRA विकासक आरीया डेवहलपर्स व त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधात गोरेगाव मनसेने घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा गणेशोत्सव गेली 20 वर्ष ज्या मुळ जागी होता त्या जागीच साजरा होण्याचा मार्ग खुला झाला आहे.

बुधवारी जवाहर नगर रोड क्र.१७ गोरेगाव (प) येथे गेली २० ते २२ वर्ष साजरा होणारा सार्वजनिक गणेशोत्सव तेथील विकासक विकास करत असलेल्या विकासक आरीया व त्यांचे असलेले हुजरे सो कॉल्ड नेते यांनी हम गणपती को मानता नही. या वाक्याच्या विरोधात, गणपती न बसवू देण्याच्या दादागिरीच्या पवित्र्याच्या विरोधात मनसे पदाधिकारी आक्रमक होताच विकासक आणि त्यांचे हुजरे थंड झाले.गणेशोत्सव आहे त्याच ठिकाणी साजरा होणार.हा पवित्रा घेण्यात आला.

विकासक आज ना उद्या येथून निघून जाईल.पुढे पैशापायी लाचार झालेल्या हुजऱ्यांचे काय ? असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिक करत आहेत.याचे उत्तर आज ना उद्या गोरेगांवकरांना द्यावेच लागणार. पी/दक्षिण विभाग सहाय्यक आयुक्त यांच्या दालनात झालेल्या या विषयाच्यावेळी मनसेचे विभाग अध्यक्ष विरेंद्र जाधव, उपविभाग अध्यक्ष सचिन सावंत,राजू साटम, सहचिटणीस अनंत सूद (बाबू), शाखा अध्यक्ष संजय खानोलकर,सचिव नरेश सावंत, सहचिटणीस अनिल पाटील, उपविभाग संघटक ओमकार धनावडे, उपाध्यक्ष विनीत गुप्ते, उपशाखा अध्यक्ष कल्पेश पाठक, रोहिणी नांगरे, मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते, यांच्यासह,गोरेगाव गणेशोत्सव समन्वय समीतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## 'महामुंबई मेट्रो' गणेशोत्सवादरम्यान चालविणार वाढीव फेऱ्या

### गणेशभक्तांचा प्रवास सुखकर होणार

प्रतिनिधी
■ मुंबई

महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमएमओसीएल) गणेशोत्सवादरम्यान मेट्रो ट्रेन सेवेच्या वाढीव फेऱ्या चालविणार आहे. सन्माननीय मुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. एमएमआरडीएचे महानगर आयुक्तआणि महा मुंबई मेट्रोचे अध्यक्ष डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे, यांनी ही घोषणा केली. उत्सवाच्या काळातील वाढीव फेऱ्यांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी परिवहन सेवा वाढविण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

गणेशोत्सवादरम्यान रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत वाढ झालेली असते. हे लक्षात घेता ११ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत अंधेरी (पश्चिम) आणि गुंदवली या दोन्ही टर्मिनल्सवरून शेवटची मेट्रो ट्रेन रात्री ११ ऐवजी रात्री ११.३० वाजता सुटेल. गणेशोत्सवात रात्री उशीरापर्यंत सहभागी झालेल्या भाविकांना आपापल्या घरी पोहचता यावे, हा या विस्तारीत सेवेचा उद्देश आहे.



या निर्णयाबद्दल महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडचे अध्यक्ष आणि मुं.म.प्र. वि.प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, डॉ. संजय मुखर्जी म्हणाले, गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सांस्कृतिक उत्सव आहे. या उत्सव कालावधीत सर्व भक्त आणि नागरिकांसाठी अखंडित वाहतूक सुविधा पुरवणे ही आमची जबाबदारी आहे. मेट्रो सेवेच्या फेऱ्यांमध्ये वाढ केल्याने उत्सवाच्या कालावधीत प्रवाशांना रात्री उशीरा प्रवास करण्यासाठी कार्यक्षम व सुविधाजनक पर्याय उपलब्ध होईल, याची खातरजमा आम्ही केली आहे.

महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक रुबल अग्रवाल म्हणाल्या, आम्ही नेहमीच आमच्या प्रवाशांच्या गरजांना प्राधान्य दिले आहे. गणेसोत्सवादरम्यान ट्रेनच्या वेळा वाढवण्याचा निर्णय म्हणजे प्रवाशांना अधिक सुविधाजनक अनुभव देण्यासाठी असलेल्या आमच्या वचनबद्धतेचे द्योतक आहे. या वाढीव फेऱ्यांमुळे गर्दी विभागली जाण्यास मदत होईल, त्याचप्रमाणे उत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन घरी परतण्यासाठी सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासाची खातरजमा होईल.

अंधेरी (पश्चिम) आणि गुंदवली टर्मिनल्सवरून शेवटच्या ट्रेनची वेळ ३० मिनिटांनी वाढवण्यात येणार आहे.दोन्ही टर्मिनल्सवरून अतिरिक्त मेट्रो ट्रेन रात्री ११.१५ आणि ११.३० वाजता सुटतील.गुंदवली ते दहिसर (पूर्व)आणि अंधेरी (पश्चिम) ते दहिसर (पूर्व) या स्थानकांदरम्यान चार वाढीव फेऱ्या सुरु केल्या जातील.

***२० अतिरिक्त फेऱ्यांचातपशील खालीलप्रमाणे***

*१. गुंदवली ते अंधेरी (पश्चिम): रात्री १०:२०, १०:३९, १०:५० आणि ११ वाजता (४ सेवा)*
*२. अंधेरी (पश्चिम) ते गुंदवली : रात्री १०:२०, १०:४०, १०:५० आणि ११ वाजता ( ४सेवा)*
*३. गुंदवली ते दहिसर (पूर्व): रात्री ११:१५ आणि ११:३० वाजता (२सेवा)*
*४. अंधेरी पश्चिम ते दहिसर (पूर्व): रात्री ११:१५ आणि ११:३० वाजता (२सेवा)*
*५. दहिसर (पूर्व) ते अंधेरी पश्चिम : रात्री १०:५३, ११:१२, ११:२२ आणि ११:३३ वाजता (४सेवा)*
*६. दहिसर (पूर्व) ते गुंदवली : रात्री १०:५७, ११:१७, ११:२७ आणि ११:३६ वाजता (४सेवा)*

## कामगारांसाठी राज्यात 304 सेतू केंद्रे - डॉ. खाडे

**मुंबई:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने एक नवीन प्रकल्प राबविण्यात आला आहे. तालुक्याच्या ठिकाणी जे बांधकाम कामगार आहेत त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन नोंदणी करावी लागते. रोजंदारी कामगार असल्याने त्यांचा तो दिवस खाडा पडतो. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी 'तालुका कामगार सुविधा केंद्र' अर्थात सेतू केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आज राज्यात 358 सेतू केंद्र चालू करावयाचे असून यातील 304 सेतू केंद्राचे आज ऑनलाईन उद्घाटन केले असल्याची माहिती कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे यांनी दिली. महाराष्ट्र महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सेतू केंद्राचे उद्घाटनाप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार संजय राठोड, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार उपस्थित होते.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

पाणी पुरवठा विभाग, ठाणे
निविदा सूचना

कोपरी येथील सिंधी कॉलनी परिसरातील इमारत क्र. ११ ते १४ येथे दूषित पाणी उपाययोजना करणेकरीता नव्याने ४ इंची व्यासाची जलवाहिनी टाकणे. या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारा विरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि. ६/०९/२०२४ ते दि. १३/०९/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. १३/०९/२०२४ रोजी पर्यंत सांय. १६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. १८/०९/२०२४ रोजी सांय. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु/४३९/२०२४-२५
दि:०५.०९.२०२४

सही/-
कार्यकारीअभियंता
ठाणेमहानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

प्रतिनिधी
■ मुंबई

## पालिकेने कुलाब्यातील तीन रस्त्यांवर लावले 'स्पाईक स्पीड ब्रेकर्स'

### मुंबईत सर्वत्र लावण्याची अँड. नार्वेकर यांची मागणी

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कुलाबा विभागात तीन रस्त्यांवर स्पाईक स्पीड ब्रेकर्स लावले आहे. त्यामुळे पालिकेचे कौतुक होत आहे. भाजपचे माजी नगरसेवक अँड. मकरंद नार्वेकर यांनी मंगळवारी पालिका आयुक्तांना पत्र लिहून संपूर्ण मुंबई शहरात विशेषत: दक्षिण मुंबईत चुकीच्या बाजूने वाहन चालवणाऱ्यांना आळा घालण्यासाठी स्पाईक स्पीड ब्रेकर्स लावण्याची मागणी केली आहे.

बीएमसी कमिशनर आणि सहपोलीस आयुक्त (वाहतूक) यांना पत्र लिहून नार्वेकर यांनी कुलाब्यातील ज्या रस्त्यांवर हे स्पाइक स्पीड ब्रेकर्स लावले होते त्या रस्त्यावर चुकीच्या मार्गाने वाहन चालवण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात कमी झाल्या असल्याचे नमूद केले आहे.

कुलाब्यातील एसबीएस रोड, नाथलाल पारेख रोड आणि कुलाबा क्रॉस लेन या तीन रस्त्यांवर आता स्पाईक स्पीड ब्रेकर्स लावण्यात आले आहेत. याआधी मलबार हिलमधील बी जी खेर मार्गावर हे स्पाईक स्पीड ब्रेकर्स लावण्यात आले होते. नार्वेकर म्हणाले की, लेनची शिस्त आणि पादचाऱ्यांची सुरक्षा राखण्यासाठी हे स्पाइक स्पीड ब्रेकर्स प्रभावी ठरले आहेत. या यशामुळे कुलाब्यातील आणखी आठ रस्त्यांवर अशा स्पाइक स्पीड ब्रेकर्स बसविण्याची मागणी आम्ही केली आहे,



बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रमुख आयुक्त भूषण गगराणी आणि वाहतूक सहआयुक्त अनिल कुंभारे यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी हे स्पाइक स्पीड ब्रेकर्स शहरभर लावावेत अशी मागणी केली आहे. बीएमसीने वाहतूक पोलिसांच्या समन्वयाने सर्वेक्षण करावे आणि ते संपूर्ण मुंबईत जास्तीत जास्त बसविण्याची कार्यवाही करावी. चुकीच्या लेनमधून वाहने चालवणाऱ्या नागरिकांसाठी हे प्रतिबंध होण्यास उपयुक्त ठरणार आहे. वाहनांना किंवा वाहनचालकांना इजा होऊ नये म्हणून, हे स्पाइक्स टायर फुटण्याइतपत तीक्ष्ण नसावेत, परंतु ते पंक्चर होण्याइतपत तीक्ष्ण असले पाहिजेत , असेही नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे.

## शहापूर नगरपंचायत, शहापूर. जि. ठाणे.

मु. पो. शहापूर, जि. ठाणे. पिन - ४२१६०१

जा.क्र.श.न.प/बांध/ ९७६/२०२४ — दिनांक- ०५/०९/२०२४

**जाहीर सुचना**

शहापूर नगरपंचायत कार्यालयामार्फत विविध विकास कामांकरिता संबंधित नोंदणीकृत / अधिकृत ठेकेदारांकडून डी लिफाफा पद्धतीने ई निविदा दि.०६/०९/२०२४ रोजी पासून मागविण्यात येत आहे. या सदर निविदांची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदांबाबत कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (कर व इतर शुल्क विरहीत) |
|---|---|---|
| 1. | शहापूर नगरपंचायत हद्दीमध्ये MPSC व UPSC ॲकडमी तयार करणे. | 79,85,136/- |
| 2. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १३ मधील जैन मंदिराची सभा मंडपासाठी शेड बांधणे. | 40,19,491/- |
| 3. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ०१ मधील तांबडमाळ येथील कुवरेपाडा ते एम.जे. स्कूल पर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे, | 1,60,16,912/- |
| 4. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ०५ मधील ओपन स्पेस मध्ये वॉल कंपाऊंड बांधणे व गेट बसविणे. | 77,94,365/- |
| 5. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.०९ मध्ये पथदिवे व हायमास्ट बसविणे. | 40,47,168/- |
| 6. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ०५ मध्ये कॉक्रिट नाले आणि गटारी बांधणे. | 79,18,923/- |
| 7. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १३ मध्ये पथदिवे व हायमास्ट बसविणे. | 78,51,000/- |
| 8. | शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ०२ मधील गणेशवाडी ते गणपती मंदिर पर्यंत जॉगिंग ट्रॅक तयार करणे व लाईटची व्यवस्था करणे. | 1,61,77,992/- |

जा.क्र.श.न.प/बांध / ९७६ /२०२४
दि. ०५/०९/२०२४

**सही/-**
**( शिवराज वि. गायकवाड )**
**मुख्याधिकारी**
**शहापूर नगरपंचायत, शहापूर**

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**बांधकाम विभाग**

**निविदा सुचना क्र. २७ (२०२४-२५)**

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील २० कामांकरीता B - 1 नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.६/०९/२०२४ ते दि. १३/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा हया दि. १३/०९/२०२४ रोजी दुपारी ३. ०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोडकरणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. १८/ ०९ / २०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे, याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तळ टिप: मी भारताचे भविष्य आहे, मी आता मतदार आहे !

**सही/-**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

**जाक्र. - कडोंमपा/ जसंवि/मुका /१६१५**
**दि. - ०५/०९/२०२४**

## ऑलिम्पिक 2024 मधील ॲथलीटला प्रियकराने जिवंत जाळले

**नैरोबी :** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या महिला खेळाडूची तिच्या प्रियकराने हत्या केली. ऑलिम्पिकपर्यंत मजल मारणारी खेळाडू रेबेका चेपतेगी जीवनाची लढाई हरली आहे. खरे तर युगांडाची धावपटू रेबेका हिला तिच्या प्रियकराने पेट्रोल टाकून जिवंत जाळले. तिच्या शरीराचा ८० टक्के भाग भाजल्याने तिचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर रेबेकाला केनियातील रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिने गुरुवारी अखेरचा श्वास घेतला. ३३ वर्षीय रेबेकाने गेल्या महिन्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मॅरेथॉनमध्ये भाग घेतला होता दरम्यान, रेबेकावर रविवारी तिच्या प्रियकराने हल्ला केल्यानंतर तिच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. डॉक्टरांनी तिला वाचवण्याचा खूप प्रयत्न केला, पण रेबेकाला मोठी जखम झाली असल्याने तिचा जीव वाचला नाही. ऑलिम्पियन आणि तिचा प्रियकर यांच्यात जमिनीवरून बराच वाद झाला, त्यानंतर तिच्या प्रियकराने तिच्यावर पेट्रोल ओतून तिला जाळले असल्याचे कळते.



## पंजाब सरकारनं वीज सबसिडी हटवली

**चंदीगड :** पंजाबमध्ये सर्वसामान्यांना मोठा धक्का बसला आहे. भगवंत मान सरकारने विजेवरील सबसिडी हटवली आहे. गुरुवारी पंजाब मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अनुक्रमे ६१ पैसे आणि ९२ पैशांनी वाढ करण्यात आली. यासोबतच घरगुती वीजग्राहकांना ७ किलोवॅटपर्यंत लागू असलेली सबसिडी वीज योजनाही मागे घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

# आम्ही युक्रेनसोबत चर्चेसाठी तयार

## भारत-चीन मध्यस्थी करू शकतात; अडीच वर्षांपासून सुरू आहे रशिया-युक्रेन युद्ध

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेनशी युद्धात तोडगा काढण्याबाबत बोलण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, पुतिन यांनी म्हटले आहे की, भारत, चीन किंवा ब्राझील दोन्ही देशांदरम्यान मध्यस्थी करू शकतात.



रशियन शहरातील व्लादिवोस्तोक येथे ईस्टर्न इकॉनॉमिक फोरम (EEZ) मधील चर्चेदरम्यान पुतिन म्हणाले की 2022 मध्ये जेव्हा युद्ध सुरू झाले तेव्हा तुर्कीने दोन्ही देशांमधील कराराचा मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्या अटींची कधीच अंमलबजावणी झाली नाही. आता पूर्वीचे प्रयत्न नव्याने चर्चा सुरू करण्यासाठी आधार म्हणून वापरले जाऊ शकतात.

पुतिन यांचे हे विधान तेव्हा आले आहे जेव्हा पंतप्रधान मोदी दोन महिन्यांपूर्वी 8 जुलै रोजी रशियाला गेले होते. येथे त्यांनी पुतिन यांच्याशी युद्ध थांबवण्याबाबत चर्चा केली. यानंतर लगेचच पीएम मोदी 23 ऑगस्ट रोजी युक्रेनच्या पहिल्या दौऱ्यावर गेले. यादरम्यान युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी भारतात दुसरी शांतता शिखर परिषद आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

यावेळी झेलेन्स्की यांच्यासोबत झालेल्या भेटीत ते म्हणाले होते, 'भारत नेहमीच शांततेच्या बाजूने राहिला आहे. काही दिवसांपूर्वी मी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली होती. मग मी मीडियासमोर त्यांच्या डोळ्यांत डोळे घालून म्हटले की ही युद्धाची वेळ नाही. याआधी फेब्रुवारी 2022 मध्ये, युद्ध सुरू झाल्यानंतर एका महिन्यानंतर, तुर्कीची राजधानी इस्तंबूलमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. युद्ध थांबवणे हा त्याचा उद्देश होता. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युद्ध थांबवण्यासाठी दोन अटी ठेवल्या होत्या.

युक्रेनला डोनेस्तक, लुहान्स्क, खेरसन आणि झापोरिझिया येथून आपले सैन्य मागे घ्यावे लागेल, असे त्यांनी म्हटले होते. याशिवाय युक्रेन कधीही नाटोचा भाग होणार नाही. मात्र, युक्रेनने या अटी मान्य करण्यास नकार दिला.

### सुप्रीम कोर्टाने फटकारले

## मुख्यमंत्री आहात म्हणून काहीही कराल का?

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

राज्याचे वनमंत्री आणि मुख्य सचिवांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून व्याघ्र प्रकल्पाच्या संचालकपदी मर्जीतील अधिकाऱ्याची नियुक्ती करणे भाजपचे उत्तरखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांना भोवले आहे. धामी यांच्या मनमानी कारभारावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत.



मुख्यमंत्री आहात म्हणून काही कराल का? आपण सरंजामशाहीत नाही, मुख्यमंत्री म्हणजे जुन्या काळातील राजे नव्हे ते सांगितले तेच करायचे, असा शब्दात न्यायमूर्ती बी आर गवई, पी के मिश्रा आणि के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने मुख्यमंत्री धामी यांना सुनावले.

मुख्यमंत्र्यांना विशिष्ट अधिकाऱ्याबद्दल ममत्व का? असा सवालही खंडपीठाने उपस्थित केला. मुख्यमंत्र्यांनी वनसेवेतील अधिकारी राहुल यांची नियुक्ती केली पण त्यांच्यावर विभागाअंतर्गत शिस्तभंगाची कारवाई प्रलंबित आहे. त्यांची राजाजी व्याघ्र प्रकल्पात अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाऊ नये, असे नमूद सचिवांनी नमूद केले असताना मुख्यमंत्री त्याकडे दुर्लक्ष करत आहेत, असे न्यायालयाने म्हटले.

सरकारकडून बाजु मांडणाऱ्या अधिवक्ता नाडकर्णी यांनी 3 सप्टेंबरला नियुक्तीचा आदेश मागे घेतल्याचे खंडपीठाच्या निर्देशनास आणून दिले. त्यावर न्यायालय म्हणाले, या देशात सार्वजनिक विश्वास म्हणून काही सिद्धांत आहेत. कार्यकारी मंडळाच्या प्रमुखांनी जुन्या काळातील राजे सांगतील तेच करावे हे अपेक्षित नाही.

अधिकवक्ता नाडकर्णी यांनी मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेला अधिकारी चांगला आहे. त्यांच्या विरोधात काहीच नाही, असा युक्तीवाद केला. त्यावर न्यायालयाने जर काहीच नाही तर आपण त्याच्या विभागीय कारवाई का करत आहात? प्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध असल्याशिवाय विभागीय कारवाई करता येत नाही, असे देखील न्यायलयाने म्हटले.

पान ९ वरुन

### 'मविआ'चे सरकार आल्यावर मोदी सरकारही जाईल!

अनेक भागात शिक्षण संस्था सुरु केल्या. शिक्षणाबरोबर दुष्काळी भाग अशी ओळख असलेल्या पलुस कडेगाव भागाचा कायापालटही पतंगराव कदम यांनी केला आहे, असे पवार म्हणाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले म्हणाले की, पतंगराव कदम हे सर्वसामान्यांसाठी प्रेरणास्थान आहेत, सामान्य कुटुंबात जन्माला आलेले पतंगराव कदम स्वकर्तृत्वाने मोठे झाले. पलूस कडेगाव भागात त्यांनी आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्रात विविध कामे करून या भागाचा विकास केला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम यांनी केले. या कार्यक्रमाला सरचिटणीस मुकुल वासनिक, प्रभारी रमेश चेन्नीथला, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, खा. छत्रपती शाहू महाराज आदी उपस्थित होते.

### आमदार विश्वजीत कदमांचे जोरदार शक्तिप्रदर्शन

मंडपाच्या मागच्या ठिकाणी पाहुण्यांसाठी पंचतारांकित भोजन व्यवस्था उभारण्यात आली होती. याशिवाय अतिमहत्त्वाच्या पाहुण्यांसाठी पंचतारांकित शौचालय आणि येणाऱ्या सामान्य लोकांसाठी शौचालय ही उभारण्यात आली होती. या मंडपाला जोडून सुमारे 14 पार्किंग लॉट उभारण्यात आले. या मंडपात जवळपास दीड लाख खुर्च्या लावून लोकांची बसण्याची सोय करण्यात आली. तसेच प्रत्येक खुर्चीवर स्नॅक्स, ज्यूस आणि पाण्याची बाटली ठेवलेली होती. या कार्यक्रमासाठी सुमारे ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, काँग्रेस नेते अशा सुमारे जवळपास दीड लाख लोकांना निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. कदम यांचे स्मृतीस्थळ हे 20 एकरात उभारण्यात आले होते. तिथे लँडस्केप गार्डन, संग्रहालय तसेच एक मोठा हॉल उभारण्यात आला होते. स्मृतीस्थळ हे पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात आले आहे.

### 1 लाख 17 हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २१ हजार २७३ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून त्यामाध्यमातून १२ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होईल. मराठवाड्यातील सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योग घटकांना त्याचा फायदा होणार आहे. इलेक्ट्रीक वाहनाच्या वापरामुळे हरितगृह वायू उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी होऊन हवेची गुणवत्ता आणि हवामान बदल कमी होण्यास हातभार मिळणार आहे.

# पित्रोदांनी आधी राहुलना बोलायला शिकवावे, परदेशात जाऊन ते भारताची खिल्ली उडवतात...

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

राहुल गांधी भविष्यात पंतप्रधान होणार, अशा सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्यावर भाजपने जोरदार प्रहार केला आहे. भाजप खासदार रविशंकर प्रसाद म्हणाले की, जर पित्रोदा यांना राहुल यांच्यात पंतप्रधानांची प्रतिमा खरंच दिसत असेल तर आधी त्यांना बोलायला शिकवा.



भाजप खासदार पुढे म्हणाले- राहुल परदेशात जाऊन भारताची खिल्ली उडवतात. ते बाहेर जाऊन इथल्या लोकशाहीवर, माध्यमांवर आणि न्यायव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करतात. पित्रोदा यांनी त्यांना कधी आणि कुठे बोलावे, कसे बोलावे याचा गृहपाठ करायला हवा.

इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी 4 सप्टेंबर (बुधवार) रोजी सांगितले होते की, राहुल गांधी हे वडील राजीव गांधींपेक्षा जास्त समजदार आहेत. बौद्धिक असण्यासोबतच ते एक उत्तम रणनीतीकार देखील आहेत. राहुलमध्ये भावी पंतप्रधानाचे सर्व गुण आहेत. सॅम पित्रोदा यांनी शिकागो येथील पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत राहुल यांची चुकीची प्रतिमा तयार करण्यात आल्याचे सांगितले. त्यांची बदनामी करण्यासाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च करण्यात आले. माध्यमांमध्ये राहुल यांची प्रतिमा नियोजित मोहिमेवर आधारित होती. राहुल खूप शिकलेले आहेत. लोक म्हणाले की ते कधीच कॉलेजले गेले नाही. त्यांच्याबद्दल खोट्या गोष्टी बोलल्या जात होत्या.

काँग्रेस नेते म्हणाले, 'राहुल यांची खरी प्रतिमा आता समोर येत आहे. त्यांच्या दोन भारत यात्रांचा यात खूप फायदा झाला. याचे श्रेय मी राहुल यांना देतो. त्याविरुद्ध ते बराच काळ लढले आणि वाचले. बाकी कोणी असते तर टिकले नसते.

एखाद्या व्यक्तीवर, त्याच्या कुटुंबावर, त्याचा वारसा, पक्षाच्या चारित्र्यावर दिवसरात्र हल्ला करणे वाईट आहे. हे असभ्य लोक आहेत जे जाणूनबुजून खोटे बोलतात, फसवतात आणि व्यक्तीबद्दल सर्व प्रकारच्या गोष्टी बोलतात. मात्र, आता माध्यमांवर कुणाचे तरी नियंत्रण असल्याचे जनतेच्या लक्षात येऊ लागले आहे. लोकांचे नुकसान करण्यासाठी बातम्या तयार केल्या जातात. खोटे बाहेर येत आहेत.

माजी पंतप्रधान राजीव गांधी आणि राहुल गांधी यांच्यातील समानता आणि फरक या प्रश्नावर पित्रोदा म्हणाले, 'मी राजीव गांधी, पीव्ही नरसिंह राव, मनमोहन सिंग, व्हीपी सिंह, चंद्रशेखर आणि एचडी देवेगौडा यांसारख्या अनेक पंतप्रधानांसोबत काम केले आहे.

# इंडोनेशियात प्रत्येक घरात 3-5 मुले

## हे सर्व देशांसाठी एक उदाहरण,अन्यथा लोक कुत्रे आणि मांजर पाळणे चांगले मानतात

**जकार्ता**

इंडोनेशिया दौऱ्यावर आलेले पोप फ्रान्सिस यांनी बुधवारी सांगितले की, येथील प्रत्येक घरात 3 ते 5 मुले आहेत. प्रत्येक देशासाठी हे उदाहरण आहे. विशेषत: त्या लोकांसाठी जे कुत्रे आणि मांजरी पाळणे चांगले मानतात. इंडोनेशियाने ही परंपरा कायम राखली पाहिजे. पोप यांच्या या विधानावर इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष जोको विडोडो हसले. याआधी मे महिन्यात देखील पोप यांनी इटलीची राजधानी रोम येथे एका परिषदेत सांगितले होते की, आजकाल घरे उदासीन होत आहेत. कारण ते सामानाने भरलेले आहेत पण इथे मुले नाहीत. मात्र, या घरांमध्ये लहान कुत्रे आणि मांजरांची कमतरता नाही. याआधी 2022 मध्येही लोक मुलांऐवजी पाळीव प्राण्यांना प्राधान्य देत असल्याबद्दल पोप यांनी नाराजी व्यक्त केली होती.



## कॅनडातील खलिस्तान समर्थक पक्षाने ट्रुडोंची सोडली साथ

**ओटावा**

कॅनडामध्ये जस्टिन ट्रुडो यांचा लिबरल पक्ष आणि न्यू डेमोक्रॅटिक पार्टी (एनडीपी) यांच्यातील युती तुटली आहे. यामुळे अल्पसंख्याक ट्रुडो सरकारला धोका आहे. आता त्यांना सत्तेत राहण्यासाठी इतर पक्षांचा पाठिंबा मिळवावा लागणार आहे. एनडीपीचे खलिस्तान समर्थक नेते जगमीत सिंग यांनी 2022 मध्ये



दोन्ही पक्षांमध्ये झालेला करार मोडत असल्याचे सांगत एक व्हिडिओ जारी केला. उद्योगपतींपुढे लिबरल पक्ष नतमस्तक झाल्याचे ते म्हणाले. ते बदल घडवून आणू शकत नाहीत.

एनडीपीने 2022 मध्ये ट्रुडो सरकारला पाठिंबा देण्याची घोषणा केली होती. एनडीपी आणि लिबरल पक्ष यांच्यातील कराराला 'सप्लाय अँड कॉन्फिडन्स' असे म्हणतात. करारानुसार, एनडीपीने विधेयक मंजूर करताना लिबरल पक्षाला पाठिंबा दिला. त्या बदल्यात ट्रुडो सरकारने एनडीपीशी संबंधित धोरणे लागू केली.

# भारत आवडत नसेल तर इथे काम करू नका

## दिल्ली HCने विकिपीडियाला खडसावले

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी विकिपीडियाला सांगितले की, आम्ही तुमचा भारतातील व्यवसाय थांबवू. सरकारला विकिपीडिया बंद करण्यास सांगू. तुम्हाला भारत आवडत नसेल तर इथे काम करू नका.

वास्तविक, हे प्रकरण विकिपीडियाविरुद्धच्या मानहानीच्या खटल्याशी संबंधित आहे. न्यूज एजन्सी एएनआयने जुलै 2024 मध्ये विकिपीडियावर खटला दाखल केला होता. एएनआयचा आरोप आहे की विकिपीडियावर त्यांचे वर्णन केंद्र सरकारचे प्रचाराचे साधन असे आहे. एएनआयने ते विकिपीडियावरून काढून टाकण्याची मागणी केली आणि 2 कोटी रुपयांचे नुकसान भरपाई मागितली. एएनआय या वृत्तसंस्थेबद्दल विकिपीडियाच्या पृष्ठावर असे लिहिले आहे की, 'एएनआयवर सध्याच्या केंद्र सरकारसाठी प्रचाराचे साधन म्हणून काम करण्याचा, बनावट बातम्यांच्या वेबसाइट्सच्या मोठ्या नेटवर्कवरून सामग्री वितरित केल्याचा आणि अनेक प्रसंगी आरोप करण्यात आले आहेत. , चुकीच्या रिपोर्टिंगचा आरोप आहे.

वृत्तसंस्थेने दावा केला आहे की विकिपीडिया फाऊंडेशनने वृत्तसंस्थेची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि बदनामी करण्यासाठी खोटी आणि बदनामीकारक मजकूर प्रकाशित केला. 20 ऑगस्ट रोजी न्यायालयाने विकिपीडियाला ANI पेज संपादित करणाऱ्या तीन सदस्यांची माहिती देण्यास सांगितले होते.

WIKIPEDIA

### देशातील चौथ्या श्रीमंत महिलेचे भाजपविरोधात बंड

## तिकीट कापल्यावर सावित्री जिंदालांची अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणा



**हिसार ।** हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने बुधवारी संध्याकाळी 67 उमेदवारांची यादी जाहीर केली. यादी येताच पक्षात बंडखोरी सुरू झाली. सोशल मीडियावर अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. त्याचवेळी, गुरुवारी सकाळी देशातील चौथ्या सर्वात श्रीमंत महिला सावित्री यांनीही बंड केले आहे. भाजपकडून तिकीट न मिळाल्याने त्यांनी हिसारमधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. सावित्री जिंदाल समर्थकांना म्हणाल्या- मी भाजपची प्राथमिक सदस्य नाही. निवडणूक न लढवण्याबाबत बोलण्यासाठी मी दिल्लीहून परत आले, पण तुमचे प्रेम आणि विश्वास पाहून मी निवडणूक लढवणार आहे.

### 'लाडक्या बहिणी'वरून कॅबिनेटमध्ये सेना आाणि राष्ट्रवादी मंत्र्यांमध्ये खडाजंगी

पान १ वरुन

शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या मंत्र्यांच्या वादात अखेर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केल्याची माहिती आहे. आगामी काळात कोणीही एकटा मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे श्रेय घेणार नाही, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, या योजनेवरून शिंदे गट आणि अजित पवार गटाचे मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीतच आक्रमक झाले होते. फडणवीसांच्या मध्यस्थीनंतर वातावरण निवळले. याबाबत शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मंत्रिमंडळ बैठकीतील वादाला पुष्टी दिली. महायुतीमध्ये वाद होऊ नयेत, या भूमिकेत आम्ही असतो. मात्र, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत मुख्यमंत्री हा शब्द नसावा. हा अट्टाहास कशासाठी? मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आणली हे आपल्या सरकारचे यश आहे. मग एकच वादा...अजितदादा हे कशासाठी. तुमच्या पक्षाच्या कार्यक्रमात या गोष्टी चालतात. पण सरकारची योजना आम्ही आणली असे सांगणं म्हणजे इतरांना दुखावण्याचा प्रकार आहे. असे वाद उदभवत राहिले तर त्याचा त्रास सर्वांनाच होणार आहे, असा इशाराही शिरसाट यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील म्हणाले, तानाजी सावंतांनी केलेल्या घाणेरडे विधानासंदर्भात शिंदे सेनेने आज भूमिका स्पष्ट करायला हवी होती. शिंदे गटाच्या मंत्र्यांनी राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांचा अपमान केला. त्यावर बोलण्याऐवजी लाडकी बहिण योजनेचा प्रचार करणाऱ्या अजित पवारांबाबत शिंदे गटाला एवढी मळमळ होण्याचे काहीच कारण नाही. सरकारची योजना म्हणून राष्ट्रवादीकडून प्रचार केला जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# हरियाणात भाजपला भगदाड... २० नेत्यांचा पक्षाला रामराम



**वृत्तसंस्था**
**चंदीगड**

हरियाणात विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून राजकीय वातावरण चांगलेच तापलं आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी आता एका महिन्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आपापल्या तयारीत व्यस्त आहेत. हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने बुधवारी ६७ उमेदवारांची यादी जाहीर केली. ही यादी जाहीर होताच हरियाणा भाजपमध्ये मोठा भूकंप झाला. उमेदवारांची यादी जाहीर होताच यादी जाहीर होताच पक्षात विरोध सुरू झाला. रतिया मतदारसंघातील भाजप आमदार लक्ष्मण नापा यांनी भाजपला रामराम केला आहे. त्यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

हरियाणात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर झाल्यापासून भाजपला नेत्यांच्या नाराजीला सामोरे जावे लागले.

### या नेत्यांनी सोडला पक्ष...

- **लक्ष्मण नापा :** तिकीट न मिळाल्याने रतियाच्या आमदाराने भाजपचा राजीनामा दिला. सिरसाच्या माजी खासदार सुनीता दुग्गल यांना रतियामधून उमेदवारी देण्यात आली आहे.
- **करण देव कंबोज:** हरियाणा भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री उंद्री विधानसभेसाठी तिकीट न मिळाल्याने पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला.
- **विकास उर्फ बल्ले :** दादरी किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष यांनी भाजपचा राजीनामा दिला.
- **अमित जैन:** भाजप युवा प्रदेश कार्यकारिणी सदस्य आणि सोनीपत विधानसभा निवडणुकीचे प्रभारी यांनी राजीनामा दिला.
- **समशेर गिल:** गिल यांनी उकलाना जागेसाठी उमेदवारी न दिल्याने राजीनामा पाठवला. तर पक्षाने या जागेसाठी माजी मंत्री अनुप धनक यांची निवड केली.
- **सुखविंदर मंडी :** हरियाणा भाजप किसान मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे.
- **दर्शन गिरी महाराज :** हिसार येथील भाजप नेत्याचाही राजीनामा.
- **सीमा गैबीपूर :** भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने सर्व पक्षीय पदांचा राजीनामा दिला आहे.
- **आदित्य चौटाला:** आदित्य चौटाला यांनी एचएसएएम बोर्डाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा. चौटाला यांनी २०१४ मध्ये भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती.
- **आशु शेरा :** पानिपतमधील भाजप महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षाचा राजीनामा दिला. तिकीट रद्द झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.
- **सविता जिंदाल :** भाजपचा राजीनामा देऊन हिसारमधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली.
- **तरुण जैन :** हिसारमधून अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली.
- **नवीन गोयल:** गुडगावमध्ये भाजपचा राजीनामा दिला.
- **डॉ.सतीश खोला :** खोला यांनी रेवाडीतून तिकिटाची मागणी केली होती. त्यानंतर पक्षाचा राजीनामा दिला.
- **इंदू वालेचा :** भाजप जिल्हा उपाध्यक्ष आणि माजी नगरसेवक संजीव वलेचा यांच्या पत्नी इंदू वालेचा यांनीही पक्ष सोडला, त्यांच्या पतीनेही भाजप सोडला.

# रवींद्र जडेजाचा भाजपात प्रवेश

## पत्नी रिवाबा जामनगरच्या आमदार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

भारतीय क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने भाजपमध्ये प्रवेश केला आहे. जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा गुजरातच्या जामनगरमधून भाजपच्या आमदार आहेत. जडेजाने यावर्षी जूनमध्ये झालेल्या टी-20 विश्वचषकानंतर या फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती.



जडेजाने पत्नी रिवाबासोबत अनेकदा प्रचार केला आहे. निवडणुकीदरम्यान तो रिवाबासोबत भाजपचा प्रचार करताना दिसला. त्याने अनेक रोड शोही केले. जडेजाने 72 कसोटी सामन्यांमध्ये 3036 धावा केल्या आहेत, तर या फॉरमॅटमध्ये 294 विकेट घेतल्या आहेत. त्याने 197 एकदिवसीय सामने खेळले, 2756 धावा केल्या आणि 220 विकेट घेतल्या. जडेजाने 74 टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून 515 धावा केल्या आणि 54 बळी घेतले. रवींद्र जडेजाने 2009 मध्ये भारताकडून T20 मध्ये पदार्पण केले. त्याने या फॉरमॅटमध्ये एकूण 74 सामने खेळले. त्याने 127.16 च्या स्ट्राइक रेटने 515 धावा केल्या आणि 54 बळी घेतले.

जडेजा हा डावखुरा गोलंदाज आहे. 2009 ते 2024 या काळात त्याचा T-20 संघात समावेश होता. या काळात त्याने एकूण 30 सामने खेळले. यामध्ये जडेजाने 130 धावा केल्या आणि 22 विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर आशिया चषकात त्याने 6 सामने खेळले. यामध्ये त्याने दोन डावात 35 धावा केल्या.